स. ठाणे
काव्य
२०२७



लेखक

लक्ष्मण गणेश वझे.

REFBK-0003435
REFBK-0003435

# कवितांविषयीं तीन शब्द.

——०*०——

( लेखक—रावसाहेब कृ. वि. वझे, ए. सी. ई. इंजिनिअर नाशिक )

परमेश्वरी सृष्टीचें सूक्ष्म अवलोकन करून त्याची नक्कल करणें किंबहुना त्यापेक्षां अधिक चांगली प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या माणसांचे तीन प्रकार होतात. ( १ ) कवि ( २ ) चित्रकार व ( ३ ) शिल्पज्ञ हे ते तीन प्रकार होत. या तिघांचीही मानासिक रचना सारखी असते. उत्तम काव्य करण्य-साठीं एका माणसाला जी प्रतिभा व कल्पकता लागते तीच प्रतिभा व कल्प-कता एका चित्रकाराला लागते व तीच एका शास्त्रीय शोध लावणाराला लागते. कोणत्याही रचनेच्या बाह्यस्वरूपाच्या आंत काय रहस्य आहे हें अंत-र्दृष्टीनें ओळखून तें आपल्या प्रतिसृष्टींत व्यक्त करून दाखविणें हेंच या तिघांचेंही ध्येय आहे. या कामीं कवि अक्षरांचा उपयोग करितात, चित्रकार रंगाचा उपयोग करितात, शिल्पज्ञ माती लांकूड वगैरेचा उपयोग करितात. हीं कामें विद्येचीं असून यांत कलाही आहे. कल्पना मनांत उभी करून भागत नाहीं. तर ती प्रत्यक्ष स्थूल जगांत उभी करून दाखवावी लागते व या साठीं तेथें ज्ञानाबरोबर कौशल्याची जरूरी आहे. हें कौशल्य ईश्वरदत्त असावें लागतें व तें तसें असलें तरी नित्य अभ्यासानें तींत भरही घालतां येते. मानवी शरिराची हीच मोठी मजा आहे कीं, अभ्यासानें त्यांत वाटेल त्या गुणांची वाढ करतां येते. या कौशल्यालाच प्रसाद व हें असणारांना प्रासादिक कवि असें म्हणतात. हिऱ्यांत ज्याप्रमाणें स्वयंभू तेज आहे, परंतु पैलू पाडिल्यानें तें नजरेंत जास्त भरतें त्याचप्रमाणें कवींत प्रसाद हा ईश्वरदत्त असतो; परंतु अभ्यासानें तो जास्त खुलून दिसतो. " Genius is a pound of inspiration and a ton of perspiration "

असें जें कार्लाइलनें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. ईश्वरी देणगीची नुसती ठिणगी असली तर तिला फुंकर वगैरे घालून सूर्याएवढी करतां येते. रा. वझे यांच्या सोबतच्या कविता अशाच प्रकारच्या ठिणगी स्वरूपाच्या आहेत. त्यांतही ईश्वरी देणगी दृष्टीस पडते.

हृदय कोणत्याही संवेदनेनें उचंबळत असतांना त्यांतून ज्या लाटा उठत असतात त्याच कवीच्या स्फूर्ति होत. या स्फूर्तीनें पद्यरचना झाली म्हणजे ती मनुष्याचें मन आनंदांत करिते; तल्लीन करते; गुंगून सोडते. अशा प्रकारचे प्रसंग रा. वझे यांच्या सोबतच्या कवितांत जागोजाग आढळतात. कवितेच्या वाचनाबरोबर मनाला स्फुरण यावें, तें पंख फडफडावूं लागावें, तें भराऱ्या मारूं लागावें व या भराऱ्यांची धांव तिन्ही काळांत असावी असा अनुभव या कविता वाचतांना येतो. कवितांचे उतारे देऊन हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं.

प्रत्येक गोष्टीचें ज्ञान वाढत जावें, तिचें रहस्य समजत जावें व याप्रमाणें आंत जातां जातां तींत जो परमात्म्याचा अंश असतो त्याचें आपणांस दर्शन व्हावें हा कवितेचा आत्मा आहे. वस्तूंत चिरकाल टिकणारा भाग म्हणजे सत्, तिच्यांत अत्यंत देदीप्यमान असणारा तेजस्वी भाग म्हणजे चिद् व मनाला उचंबळून उन्नतावस्थेस पोंचविणारा भाग म्हणजे आनंद. व हेंच सद् चित् व आनंद असें परमात्म्याचें स्वरूप आहे. कोणत्याही गोष्टींत हें परमात्म्याचें स्वरूप प्रतीत झालें म्हणजे तेथें कळण्याची सीमा झाली व ही कवितेच्या उत्तमपणाचीही सीमा होय. " वाचें बरवें कवित्व ॥ कवित्वीं बरवें रसिकत्व ॥ रसिकत्वीं परतत्व ।। स्पर्शू जसा " ज्ञानेश्वरी अध्याय १८ ओ. ३४७. भाषेंत उत्तम शब्दयोजना असावी, तिच्यांत पूर्ण रसिकता असावी, व तींत आत्मज्ञानाची ओळख व्हावी म्हणजे ती कविता उत्तम; असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. या नमुन्याच्याही कांहीं कविता सोबतच्या संग्रहांत आहेत.

मनुष्याला सन्मार्गाला लावण्याचें साधन कविता आहे. तिचीं शिकवण कोमळ, प्रेमळ व हृदयस्पर्शी असते. खोडकर मुलाला आई जशी थोपटून निजविते त्याचप्रमाणें उच्छृंखल मनाला चुचकारून नीतीच्या कह्यांत आणण्याचें काम कविता करिते. हें काम करीत असतांना ती केव्हां केव्हां रागावते व डोळे वटारते; केव्हां रुसते व रडते. केव्हां आनंदित होऊन नाचूं बागडूं लागते. केव्हां लडिवाळपणानें मुके घेते व हंसते. व या प्रमाणें निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या युक्त्यांनीं मनाला योग्य वळण लाविते. असे प्रसंगही या कविता-संग्रहांत वाचकांना पाहाण्यास मिळतात. कोठें कोठें निंदेचे चिमटे व तिरस्काराचे तडाखे उडविलेले आढळतील. पण हे मातेच्या प्रेमळ चापट्याप्रमाणें असून एकाद्या मांगाच्या फटक्यांप्रमाणें नाहींत; ही गोष्ट स्पष्टपणें अनुभवास येते. तात्पर्य उपदेशपर कवितांचे उत्तम नमुने यात पहावयास मिळतात. व ते हल्लींच्या परिस्थितीला अनुरूप असे आहेत.

माणसांच्या मनोवृत्तींचे दोन प्रकार होतात. ( १ ) चंचल व ( २ ) स्थिर. चंचल मनोवृत्ति क्षणिक असतात पण त्यांत एक प्रकारचा जोम असतो. व त्या योगानें त्या रमणीय वाटतात. हर्ष, शोक, स्मृति, आळस, लाज, दीनता, क्रोध या वृत्ति अशा प्रकारच्या चंचल वृत्ति आहेत. या मनोवृत्ति एका ठिकाणीं फार वेळ राहूं शकत नाहींत व त्या वर्णनांत वगैरे फार वेळ दाखविल्या म्हणजे त्या निरस होतात. मूर्ति, देवता यांच्या ठिकाणीं या दाखवूं नयेत असें जें शिल्पकार म्हणतात तें याचसाठीं. क्षणिक दर्शनाला या वृत्ति योग्य आहेत पण अखंड ध्यानाला त्या अयोग्य आहेत. आपण आपली कृति कोणत्या उद्देशानें करितों हें पाहून तींत त्या उद्देशाला पोषक अशा मनोवृत्ति दाखवाव्या लागतात. छंदोबद्ध रचनेला वृत्त अशी संज्ञा आहे. व हीं वृत्तें त्या त्या मनोवृत्तीला अनुकूल अशीं वापरलीं म्हणजे कविता अधिक रमणीय होते. चंचल मनोवृत्तीला चंचलवृत्त असावें म्हणजे बरें पडतें.

स्थिर मनोवृत्ति पुष्कळ वेळ टिकतात. त्यांत मोठा जोम नसतो. परंतु एकच आवेग पुष्कळ वेळपर्यंत सारखा टिकत असतो. प्रेम, उत्साह, वैराग्य, धैर्य वगैरे मनोवृत्ति अशा जातीच्या आहेत. ध्यानाच्या पूजेच्या मूर्तींना या मनोवृत्ति योग्य होत. यांत जितकी अखंडता व चिरस्थायित्व असेल तितक्या त्या रमणीय दिसतात. रामायणांतील रामाची सत्यनिष्ठा, मारुतीची स्वामिनिष्ठा व लक्ष्मणाचें बंधुप्रेम आणि सीतेचें पावित्र्य यांतच सर्व गोडी आहे. अथपासून इतिपर्यंत या गोष्टी स्थिर भावानें आपले दृष्टीस पडतात. या वृत्तींना मंद वृत्तें जास्त पोषक आहेत. गंभीर मनोवृत्तांना गंभीर वृत्त व शब्दरचना जास्त खुलावट देते.

सोबतचा कवितासंग्रह तुटक असल्यानें त्यांत स्थिर मनोवृत्तींना फारसा वाव नाहीं. तथापि चंचळ व स्थिर मनोवृत्तींना पोषक अशी कविता–रचना यांत आढळून येते. मन चंचळ करणारे प्रसंग तर यांत पुष्कळच आहेत व त्याला या संग्रहांत पुष्कळ वावही आहे.

अलंकारशास्त्राचे नियम मनुष्याच्या मनोरचनेचा सूक्ष्म विचार करून केलेले असले तरी त्यांचा उपयोग साध्य व साधन यांचा तारतम्य भाव मनांत आणूनच केला पाहिजे. हा तरतमभाव नाहींसा झाला म्हणजे कवितेचा जिवंतपणा जाऊन तींत भावलीपणा येतो. मेलेला मनुष्य किंवा प्राणी, बेशुद्ध झालेला मनुष्य किंवा प्राणी व गाढ झोंपी गेलेला मनुष्य किंवा प्राणी यांत बाह्यता जरी सारखेपणा दिसला तरी ज्ञात्याला त्यांत स्पष्ट भेद दिसतो. तीच गोष्ट कवितावगैरे संबंधीं खरी आहे. धीट, पाठ, व प्रासादिक असे जे कवींचे तीन प्रकार समर्थांनीं केले आहेत ते याच धोरणानें. धीट कवींचीं कविता मेलेल्या मढ्याप्रमाणें असते, पाठ कवींची कविता बेशुद्ध प्राण्यांप्रमाणें असतें आणि प्रासादिक कवींची कविता समाधिस्थ किंवा गाढ झोंपी गेलेल्या माणसाप्रमाणें असते. ठाकठीक, निश्चलता, गंभीर दर्शन यांत जरी

त्यांत सारखेपणा असला ( कधीं कधीं अ-प्रासादिक कवींतच टापटीप जास्त असते ) तरी निसर्गसदृश स्वाभाविकपणांत अंतर पडल्यानें यांची रमणीयता कमीजास्त होते. हा प्रसाद या कवितासंग्रहांत दिसून येतो.

"राजा कालस्य कारणं" या म्हणीप्रमाणें कोणतीही गोष्ट राजमान्य झाली म्हणजे ती ग्राह्य असते. पाश्चात्य पोषाक, पाश्चात्य चालीरीति, पाश्चात्य आचारविचारांची बोलबाला हल्लीं याच कारणानें आहे. कवितेंत भाषाप्रचारांत सुद्धां ही अनुकरणप्रीयता दृष्टीस पडते. लोकांची घेण्यालायक गोष्ट घ्यावी. परंतु ती आपल्या परंपरेत योग्य प्रकारें मिसळून टाकावी. ही गोष्ट साधेल त्यानेंच हें अनुकरण करावें. असें न झाल्यास धेडगुजरी प्रकार होऊन तो रसिकांच्या मनाला उद्वेग उत्पन्न करितो. असा प्रसंग सुद्धां या कविता-संग्रहांत क्वचित् दृष्टीस पडतो.

एकंदरींत कविता-संग्रह चांगला असून कवि हे होतकरू आहेत; असें म्हणण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं. व असें स्फुरण नेहमीं होत राहील तर अभ्यासानें तें उत्तम स्वरुपाला जाईल असें वाटतें.

# अल्पनिवेदन.

—:०:—

'विवेक' या टोपण नांवानें आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कविता पुस्तकरूपानें समाजापुढें येत आहेत. या कवितांत क्वचित ठिकाणीं थोडाफार बदल केलेला आहे.

रावसाहेब कृ. वि. वझे, इंजिनियर यांनीं कवितांबद्दलचा आपला अभिप्राय दिला या बद्दल मी अत्यंत आभारी आहे.

सदर पुस्तक प्रकाशित करण्याबद्दल रा. विश्वनाथ गणेश ताम्हणकर मॅनेजिंग डायरेक्टर, महाराष्ट्र पाब्लिशिंग हाऊस पुणें यांनीं जी आस्था दाखविली त्याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

तसेंच पुस्तक छापण्याचे कामीं भारत-सेवक छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं जें सहाय्य दिलें त्याबद्दलही मी त्यांचा आभारी आहे.

—लेखक.

क्र. ५१३५
शाखा (स्थळ प्रत)
ठाणे

# काव्य-हार

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य हार
क्र.
ठाणे

## प्रार्थना

( राग—मालकंस-त्रिताल )

१

आलों प्रभूजी ॥ तव दर्शनास मी ! ॥ ध्रु० ॥

पतित दीन शरणागत
दारिं उभा तव तिष्ठत
जगत्प्रभो ! त्वरित भेट
पाहिं वाटुली !

REFBK-0003435
REFBK-0003435

२

विमल भक्ति हेंच सुमन
मजजवळीं तें अर्पुन
करितों मी तव पूजन
हृदयदेउळीं ॥

३

भवरूपी वन्हि सतत
हृदय पोळि कष्ट देत
त्राता तूं म्हणुनि येथ
धांव घेतली

४

मी गा! तव चरणदास
लागो तव चरणिं ध्यास
हीच मनीं एक आस
प्रभो राहिली

---

## श्रीशिवनृपदर्शन

[ वृत्त-पृथ्वी ]

१

नमोस्तु शिव-भूपते ! विजयवंत राजेश्वरा !
त्वदीय चरणीं मदीय शिर ठेविलें धी-वरा
प्रताप महिमा तुझा सकल लोक गाती मुदें
अजाण कवि हा त्वदीय गुणगीत केंवी वदे !

२

प्रमत्त रिपुंनीं पदीं नमविला महाराष्ट्र हा
तदा अवकळा-तमा पसरली भयाची महा
अशा विषम-संकटीं तुडविण्यास उच्छृंखलां
त्वदीय अवतार हा जगिं शिव-प्रभो जाहला

३

स्वराष्ट्र-हित-कारणीं अमित साहिले कष्ट तूं!
स्वधर्मिं मन ठेविलें, अतुल राजसा वीर तूं!
स्वबंधुहृदयांतरीं अमित ओतिलें ओज तूं !
अचेतन असा क्षणीं उठविला महाराष्ट्र तूं!

४

अकारण असी-बलें चिरुनि गोद्विजांचे गळे
विधर्मि रिपुंनीं अमानुषपणें बळी घेतले
अशा प्रबल विद्विषां निजकरें तुवां दंडुनी
जनांप्रति दिलें अहा ! अभयदान राया झणीं

५

अगा शिवनृपा ! महानुभवि साधु रामप्रिय
परात्पर गुरू तुझे मग तुला न कां ये जय !
तदीय मधुरा गिरा अमृततुल्य लाभे. तुला
स्वराज्यरण-कंदनीं स्फुरण देइ जी आजला

६

सुगंधि कुसुमें जिथें रुचिर हांसती निर्भर
सदैव अभिनंदनामधुर वाहती निर्झर
जिथें प्रकटला सुभव्य मधुसा वनश्रीनिधी
जयास करिती प्रणाम जयशब्दघोषें सुधी

७

सचेतन सुभाग्यवान् स्फुरणशील सह्याचल
बघोनि पुलकीत हो हृदयभावनांचा तल !
निसर्गरमणीयता पसरली जिथें मंगला
तदाश्रय रणप्रणोदित नृपा मिळाला तुला

८

तुझे संवगडी रणोत्सुक असे गुणी मावळे
स्वराष्ट्रहितकारणीं रिपुसवें रणीं झुंजले

वनांत फिरले महा कठिण यातना सोसुनी
सदैव भजले स्वराज्य अधिदेवता मानुनी

९

पराक्रम महा तुझा विजयशीलसा पाहुनी
सु-धीर नृपती मनीं चरकले स्व-सिंहासनीं
करोनि ' पण ' पातले समरभूवरी वीर जे
तयांस रणिं जिंकुनी यश दिलें सुभाग्या जिजे

१०

स्व-धर्मनिरत प्रभो ! विजयवंत बाहूबलें
कृतांतसम विद्विषां समरभूवरी मारिलें
स्वराज्य ' कमलापतीभवन' हें प्रतिस्थापिलें
तशीं अभय केलिं हीं परमपुण्य धर्म-स्थलें

११

स्वराज्य-नृपती जनीं, म्हणुनि मान्य केलें तुवां
अपूर्व अभिषेकिलें द्विजवरें श्रुतीनें तुला
सुछत्र तव मस्तकीं विलसलें तसें चामर
खरा विभवशील तूं विलसलास या भूवर

१२

यशोन्नत नृपा ! तुझ्या विजयकीर्तिचें भूषण
गडावरि विराजलें विभवशील सिंहासन
स्वराज्यविजयध्वजा फडकली नभोमंदिरीं
जिला मनिं झुरे बघोनि अमराधिकारी हरी

१३

खरोखर नृपा तुझ्या रुचिर दर्शनें आजला
अती मन उचंबळे परि न सांगतां ये मला
स्फुरे हृदय-शक्ति ही शरिर होय रोमांचित
प्रभाव गुणगायनीं मन तुझ्याच होई रत

---

## वीर महाराष्ट्रभूमीस

( चंद्रकांत राजाची० )

१

स्वातंत्र्याचा अरुण उदेला उदय-गिरी-शिखरीं
तयें उधळिलें तेज पहा या निद्रित जनांवरी
वागीशांचे स्फूर्तिशब्द जे भेदिति गगनाला
त्यांनीं पुनरपि जागृति आली सुषुप्त जनतेला
अचेतनांतहि चैतन्यानें खळबळ बहु केली
मातृभूमितें उद्धाराया जनता ही उठली
महाराष्ट्र-भू ! वीरजननि तूं कीर्ति तुझी थोर
वंदन करितों प्रेमपुरःसर ठेवुनि चरणिं शिर
विक्रमशाली तुझे वीर सुत चिरंजीव झाले
त्यांचें पुण्यस्मरण मन्मनीं या कालीं झालें

२

बाहुबलानें रणांगणीं तुज पराभूत केलें !
महाराष्ट्र-भू ! यवनांनीं मग दास्याहत केलें

अपहरिली गे स्वातंत्र्य-श्री त्याच विद्विषांनीं
डबघाईला राष्ट्र आणिलें धर्म-द्रोह्यांनीं
यदुनाथाचा किंवा रघुकुळभूषण रामाचा
अवतार जसा नाश कराया झाला दुष्टांचा
अवतार तसा शिवप्रभूचा धर्म-रक्षकाचा-
दीनोद्धारक देशोद्धारक अभिनव वीराचा
रामदास गुरु पढियंते त्या ईश्वरांशभूत
आणि मस्तकीं देवि भवानी ठेवि कृपाहस्त
मुक्त कराया परदास्यांतुनि महाराष्ट्रदेश
अविरत लढला शत्रु-दळाशीं भ्याला ना लेश
शिवप्रभूनें जागृत केलें हताश जनतेला
स्वातंत्र्यास्तव लढावयाला स्वतां पुढें सरला
वीर मराठे, वीर मावळे, एकत्रित केले
उपदेशामृत पाजुनि त्यांना देशभक्त केलें
दासत्वाचे पाश तोडण्या त्याची तरवार
शत्रुदळावरि चपलेपरि ती फिरली चौफेर
तोरण्यावरी स्वराज्यतोरण बांधुनि शुभकालीं
स्वातंत्र्याची प्राणप्रतिष्ठा तयें तिथें केली
स्वातंत्र्य-श्री दासी होउनि पर-गृहिं जी गेली
ती शत्रूच्या मगरमिठींतुनि ओढुनि आणियली
विगतवैभवा गृहीं आणिलें समरीं झुंजोनी
कर्तबगारी धन्य तयाची धन्य वीरजननी

बलशाली रिपु--दुष्ट–कल्पना भेदुनि जो जाय
महाराष्ट्र-भू ! शिवप्रभू तो धन्य नव्हे काय ?

३

तो आबाजी ब्राह्मण वीर शौर्य-तेज त्याचें
शत्रुरक्तिं तें पावन झालें समरांगणिं साचें
महाराष्ट्र-भू स्वतंत्र करण्या रणांगणीं लढला
विजयश्रीनें हार घातला त्या रण-नवऱ्याला
महाराष्ट्र-भू ! शिवप्रभूचा वांचविण्या जीव
तुझा वीर सुत मृत्युंस अर्पी प्रियकर निजजीव
बाजि प्रभू तो अरि-रक्ताचा घ्यावयास घोट
खिंडीमाजी उभा ठाकला अडवुनियां वाट
स्वातंत्र्यास्तव लढतां लढतां मरुनिया गेला
विष्णुपदाशीं पुण्यात्मा तो जाउनिया ठेला
पुरंदराचा मुरारबाजी अजिंक्य वीर-मणी
निर्जीवाला स्फुरविल त्याची अद्भुत ती करणी
तुटोनियां शिर पडलें खालीं रिपुच्या खड्गानें
प्राण सोडिला रणांगणावरि वीर मराठ्यानें
समरस्फुरणें कबंध त्याचें परि रिपुशीं लढलें
महाराष्ट्र-भू ! तयें तीनशें शत्रु ठार केले
शिवप्रभूचा बाळपणाचा परमप्रिय मित्र
महाराष्ट्र-भू माते ! तव जो धीर वीर पुत्र
स्वातंत्र्यास्तव सिंहगडावरि त्या तानाजीनें
आत्मयज्ञ गे केला प्रेमें त्या नर-सिंहानें

४

महाराष्ट्र-भू ! वैभवशाली शिवप्रभू झाला
रायगडावरि स्वराज्यकीर्तिध्वजही फडकविला
सह्यगिरीच्या दऱ्यादऱ्यांतुनि राष्ट्रस्फूर्तीचीं
अभिनवगीतें जीं घुमलीं त्या नर-शार्दूलाचीं
तीं गीतें बघ आज अम्हांला स्फुरण बहू देती
महाराष्ट्र-भू ! नव आशेचे अंकुर मनिं येती

५

स्वातंत्र्याचा विक्रमशाली बारा मावळला
दासत्वाचे पाश घेउनी शत्रु पुन्हा आला
संभाजीनें खलरिपुला त्या जर्जर बहु केलें
महाराष्ट्र-भू ! शिवप्रभूचें तेजहि दावियलें
महाराष्ट्र-भू ! वीररत्न परि संभाजी भूप
अपघातानें मरण पावला राष्ट्रकीर्तिदीप

६

महाराष्ट्र-भू ! स्वातंत्र्यारी धर्मवेड ज्याला
पडत्या काळीं हरण कराया पुन्हा तुझें आला
परी तुझे सुत वीर मराठे स्वातंत्र्यासाठीं
स्वातंत्र्यरणीं लढले निर्भय मातृभूमिसाठीं
स्वातंत्र्यप्रिय राजनिष्ठ सुत खंडो बल्लाळ
अलोट धैर्यप्रभवें त्यानें दिपविलाहि काळ
शस्त्रांची दाविली चमक त्या जाधव वीरानें
निष्प्रभ केलें शत्रुदळाला गनिमी काव्यानें
नरवीरांच्या यशःप्रकर्षें तळमळल्या आशा
पुनरुज्जीवित झाल्या, पुनरपि जागृति ये देशा

७

विक्रमशाली ब्राम्हण, बाजी दाक्षिणचा वीर
शत्रुदळावरि फिरली ज्याची चपला तरवार
देशद्रोही स्वकीय रिपुंना पराभूत केलें
महाराष्ट्र-नृप-सिंहासन गे ! त्यानें वांचविलें
छत्रसाल नृप काळमुखांतुनि शौर्ये सोडविला
निजाम दांतीं तृण घेउनियां शरण यास आला
चाकित जाहला धाडस पाहुनि दिल्लीचा राजा
युद्धकलानिष्णात बाजि तो भार्गवराम दुजा
दुष्ट फिरंगी लोक छळीती जेव्हां हिंदूस
निर्दाळाया सिद्ध जाहला दळासहित त्यांस
पुण्य पुरुष चिमणाजीअप्पा क्रोधें थरारला
उन्मत्तांतें शासायाला वसईला गेला
समरवीर तों राघु भरारी अटकेला गेला
महाराष्ट्र-भू ! भगवा झेंडा तेथें फडकविला
दिल्लीचें तें तक्त फोडुनी निर्भय वृत्तीनें
भयभित केलें म्लेंन्छ नृपांना भाऊ वीरानें
माधवरायें हैदरअल्ली जर्जर बहु केला
निजाम याचें साहस पाहुनि निजमनिं घाबरला
पानिपतावरी अपयश आलें जें जरिपटक्याला
तयें लागला डाग अमंगल मराठ—कीर्तीला
स्वातंत्र्यरणीं लढुनी अविरत अरिशीं शौर्यानें
धुवुनि टाकिला डाग अमंगल अभिनव वीरानें

पहा सवाई माधवराया भारत-नृपतींचा
नृपती झाला, महाराष्ट्र-भू ! तुझा पुत्र साचा
आत्मनाश परि केला सहसा माधवबाळानें
अतां कशाला दुःख तरी तें ! ब्रह्मलिखित होणें

८

महाराष्ट्र-भू ! आणि तुझे सुत पवित्र तीर्थाला
जे गेले त्यां प्रेम पुरःसर वर्णित या वेळां
फणी विषारी मित्र जयाचा महाराष्ट्र-माते
मल्हारी तो वीरपुत्र तव भजला राष्ट्रातें
असितेजानें ज्यांनीं उत्तर-नृपती हालविले
दत्ताजी, जनकोजि, जयाप्पा धन्य जगीं झाले
राजकारणीं दिल्लीपतिला अंकित करूनिया
पाटिलबावा आला देशीं वैभव घेऊनिया
आंग्ल देशिंच्या वीरवरांना खडकी समरांत
खडे चारिले हरिपंतानें करूनिया मात
पटवर्धन नी विंचुरकर हे ब्रह्मकुलीं झाले
रक्ताची पांवळी करुनिया देशास्तव लढले
बुद्धिबलानें चातुर्यानें रिपुला झुलवीलें
पडत्या काळीं त्या नानानें रक्षण तव केलें

९

बापु गोखले वीर ब्राह्मण धीरवंत साचा
अष्टीचे रणिं लढतां पडला धीरा शेवटचा
महाराष्ट्र-भू ! स्वराज्य-दिनमणि अस्ताला गेला
तेव्हांपासुनि दास्यध्वांतीं महाराष्ट्र पडला !

काव्य ८३२

# लोकमान्यवंदन

( मंदाक्रांता )

१

दास्यत्वाची चरणिं बघुनी शृंखला जन्मभूच्या
अंतर्यामीं प्रसव न दिला कल्पनांना सुखाच्या
ऐश्वर्याला भुलुनि न तुवां राजमार्गीय यांच्या
आलंबीला खडतर असा मार्ग देशोन्नतीचा

२

निद्राभ्यासी जन उठविले केसरी–गर्जनेनें
धर्मग्लानी उडवुनि दिली श्रीगणेशोत्सवानें
देशोद्धारी शिवनृपतिच्या उत्सवानें सु–वेळीं
स्वातंत्र्याची जनपदहृदीं भावना खेळवीली

३

राष्ट्रासाठीं खडतर असा साहिला बंदिवास
केला प्रेमें सहन कुमती–लोक–निंदोपहास
कर्तव्याला त्यजुनि न परी कार्य केलें अपार
वीरांमाजी तुजसम असा तूंच बा एक वीर

४

सत्पक्षाला स्वकरिं धरुनी ध्येय साधावयास
ज्ञानासीनें समिति–समरीं जिंकिलें पंडितांस
त्वत्कार्याची नवलपरिची पाहुनीया धडाडी
वैऱ्यांनींही हलवुनि शिरें ठेविले हात तोंडीं

५

स्वातंत्र्याची तळमळ तुझ्या लागली जी जिवास
ती निश्वासीं दिसलि तुझिया प्रत्यहीं भारतास
त्याच्या साठीं तन मन धन स्फूर्तिनें वेंचियेलें
लोकश्रेष्ठा ! अभिनव यशें भारता भूषवीलें

६

श्रीमद्गीता कथुनि विजया संगरीं श्रीवरानें
कर्तव्याची भुरळ पडली दूर केली प्रयत्नें
कारागारीं विवश जनतेसाठिं हा माननीय
विद्वन्मान्या ! स्वकरिं लिहिला ग्रंथ गीतारहस्य

७

न प्राणांचें भय धरुनिया अल्पही चित्ति राया
उल्लंघोनीं जलनिधि जरी जाहली जीर्ण काया
पृथ्वीव्यापी प्रखर रण जें माजलें वेळिं ऐशा
संग्रामाला मलिन मतिशीं जाशि तूं आंग्लदेशा

८

दिव्यस्फूर्ती स्फुरविलि जनीं कर्मयोगेश्वरा हे !
सत्वासाठीं सतत फिरुनी जन्मभून्या स्व-देहें
व्हायाचें तें विधिहि न शके चूकवायास होणें
दाटे कंठीं गंहिवर परी त्वद्गुणांच्या स्मृतीनें

९

ईशेच्छेनें मरण तुजला येऊनी देह-यष्टी
शून्यामाजी मिसळुनि जरी जाहली आडदृष्टी
त्वद्वाणीची अणुअणुमधें भीनली दिव्य शक्ती
देई आम्हां स्फुरण आजि ती वाढवूं राष्ट्रकीर्ती

१०

धीरोदात्ता ! प्रगतिपर जें उच्चशीलाभिजात
पावित्र्यानें गुरुपद जया प्राप्त झालें जगांत
सम्राटांनीं कुतुक करुनि प्रत्यहीं ज्यास गावें
पुण्यश्लोका ! तव सु-चरिता वंदितों प्रेमभावें

---

## चतुर्योग

( अभंग )

कर्तव्य करुनी ॥ एकनिष्ठपणें
आत्मानुभव घेणें ॥ कर्मयोग
साकार प्रभूची ॥ पूजा करुनीया
साधणें मोक्ष हा ॥ भक्तीयोग
चित्तसंयमनें ॥ समाधीला जाणें
बोलिला हा जनें ॥ राजयोग
जगीं आत्मरूप ॥ ओळखूनी ज्ञानें
एकरूप होणें ॥ ज्ञानयोग



# आर्यपुत्रांस विनंति

( स्रग्धरा )

१

वीरांची वीरभूमी म्हणुनि जगभरी नादली कीर्ति जीची
ऐश्वर्याची महर्घा प्रचुरतरखनी जी जगीं होति साची
एका काळीं अनाथां प्रभुसम अशि जी आश्रयस्थान झाली
ती श्रेष्ठा आर्यभूमी सकलगुणवती पारतंत्र्यीं निमाली

२

झाला या आर्यभूचे सकल सुत तुम्ही वीरताहीन काय ?
मुक्तिप्रीत्यर्थ तीचे सुचति न मतिला पौरुषाचे उपाय
बेकी टाकून एकी सकल जन करा वाढवा संघशक्ति
व्यर्थ स्वार्थ त्यजूनी प्रतिपलिं हृदयीं बाळगा देशभक्ती

३

सोडा आलस्य, जोडा सुकृति सरलता, चित्तिंचें द्वैत तोडा
मोडा राष्ट्रीय अंतःकलह सुमतिनें लागुं दे राष्ट्रि ओढा
चित्तामाजी अहंता लवहि धरूं नको बाळगा कार्यचिंता
स्थापा साहूनि तापा खडतर, अपुली उज्ज्वला राष्ट्र-सत्ता

४

शृंगारा देह सारा जनपदवसनीं ठेवुनी शुद्ध भाव
अंतर्बाह्य स्वदेशी बनुनि दृढ करा आर्य-भूचा प्रभाव
धर्मी कर्तव्यकर्मी निरत रत रहा नाठवा अन्य-सेवा
मूलाधार-प्रभेला सतत तुह्मि भजा अंतरीं प्रेम ठेवा

५

देशासाठीं सदाशा धरुनिच लढले जे रणीं आर्यवीर
सोत्साहें वाढवा कीं प्रचुर-तर तदीयोत्सवाचा प्रचार
प्रीती ठेवूनि चित्तीं निशिदिनिं अपुल्या चालवा देशकाज
माझी ही आग्रहाची सविनय विनती आर्य-पुत्रांस आज

---

## स्वातंत्र्यप्राप्तीकरितां !

( उद्धवा० )

१

त्यजुनिया राजवाड्यास । हा प्रताप रजपुतबाळ
करुनिया जिवाचें रान । फिरफिरला रानोमाळ
धरुनिया स्वाभिमानास । भूषविलें शील स्वकुल
झुलविलें प्रतिस्पर्ध्याला । करुनिया समर—हिंदोल
देशास्तव निरिच्छ झाला
दगडांवर उघडा निजला
सेविलें कंद—मूळांला
परि रिपुशीं अविरत लढला । स्वातंत्र्यप्राप्तीकरितां !

२

दिल्लीच्या सम्राटाचा । स्वीकारुनि सेवाधर्म !
जातिवंत रजपुतराजे । झाले कीं दास प्रथम !
स्वसुताहि देउनि त्यांतें । कितिकांनीं केला साम
धर्मांतर विफल करूनी । केला तैं नरकिं विराम

परि राणा प्रताप वीर
घेउनी करीं तरवार
स्वातंत्र्य-रणीं निर्घोर
आमरण रिपूशीं लढला । स्वातंत्र्यप्राप्तीकरितां !

३

दिल्लीच्या सम्राटानें । वेढियलें चोहींकडुनी
उदेपूर भाग्यश्रीला । रसातळा न्यावी म्हणुनी
जीवाची आटाआट । दीर्घ काल मोठी करुनी
पाहिलें पदीं नमवाया । हा प्रतापराणा मानी
परि आशा व्यर्थच झाली
ना मान मुळीं वांकविली
कुटिलाच्या चरणीं अपुली
क्रीडला रणांगणिं राणा । स्वातंत्र्यप्राप्तीकरितां

४

स्वार्थांध देशबंधूंच्या । विश्वासघातवृत्तीनें !
अजवरीं बुडालीं राज्यें । किती सांगुं अहा शब्दानें
करुणकथा स्वातंत्र्याची । कथिलेली इतिहासानें
वाचुनी पाहतां खास । अश्रूंनीं भिजतिल रानें
परि अशाहि भीषण समयीं
स्वातंत्र्यभावना हृदयीं
धरुनिया राणा निश्चयी
निःशंक रणांगणिं लढला । स्वातंत्र्यप्राप्तीकरितां

———

# वीर–प्रबोधन

( नीज़ गुणी० )

१

वीरा ! तूं झोंप घेशि अजुनि कुठवरी !
अरुणोदय नभिं झाला ऊठ झडकरीं ॥ धृ० ॥
धीर वीर तव पूर्वज खड्ग घेऊनी
देशास्तव निज रिपुशीं झुंजले रणीं
शौर्यबलें वंदनीय जाहले जनीं
जागृत कां स्मृति न होय ती त्वदंतरीं

२

विपिनाला कुसमाकर देइ चारुता
गगनाला शरच्चंद्र आणि रम्यता
पुरुषाला भूषविते तैशि वीरता
धैर्यानें पुढति सरुनि चमक भूवरी

३

तरुण वीर समरधीर असुनि सिंहसा
तेजोहर शय्येवरी लोळसी कसा
दुर्बलता कैशि रुचे तुझ्या मानसा
कर्मयोग आचरिसी कां न हा तरी

# फांसावरचें गाणें

( उद्धवा० )

१

स्वातंत्र्यभक्त वीराचें ॥ हें गाणें फांसावरचें ॥ ध्रु० ॥
स्वाभिमान हृदयीं ज्याच्या ॥ धीर वीर सुगुणी बाळ
स्वातंत्र्य रणाचे ठायीं ॥ शौर्याचे खेळुनि खेळ
उजळिला दीप कीर्तीचा ॥ कवटाळुनि निर्दय काळ
फांसावर निर्भय चढुनी
देशास्तव गेला मरुनी
परि त्याची निरोपवाणी
स्फुरवील रक्त तरुणांचें ॥ हें गाणें फांसावरचें !

२

महाराष्ट्रमांडीवरतीं ॥ प्रेमानें खेळत होता
स्वातंत्र्यप्राप्तीवीण ॥ अन्य हेतु ठाउक नव्हता
ह्या कर्मवीर देशाचा ॥ सन्मार्गावरुनी जातां
उन्मत्त शक्तिनें त्याला
फसवुनी अवचितां धरिला
तो प्रसंग दारुण तसला
रडवील हृदय काळाचें ॥ हें गाणें फांसावरचें !

३

धीरता पूर्ण धैर्याची ॥ तशि चैतन्याची ज्योती
निर्जिवास देई स्फुरण ॥ जी स्वातंत्र्याची स्फूर्ती
गंभीर मूर्ति बाळाची ॥ ती चढली फांसावरतीं

[library stamp]

विक्राळ काल नयनांला
जरि दिसे पुढें लढिवाळा
तरि हंसुनि वदे तो सकलां
देशास्तव मरणें साचें ॥ हें गाणें फांसावरचें !

४

" मी तरुण वीर मातेचा ॥ एकुलता एकचि बाळ
दुःखांत लोटुनी तिजला ॥ ओढुनियां नेई काळ
शांतवा तिच्या चित्ताला ॥ सांगुनियां गोष्टी सकल
देशास्तव मरणें साचें
हें ब्रीद असे तरुणांचें
मरणास नाहिं भ्यायाचें
तेच कीं तरुण राष्ट्राचे ॥ हें गाणें फांसावरचें !

५

अभिमन्यु वीर अभियुक्त ॥ समरांगणिं मरुनी गेला
रणपंडितसंगें लढतां ॥ भ्याला न कांहिं मरणाला
नवयौवन होता बाळ ॥ हें विदित असे कीं सकलां
मग मीहि तसा हा असतां
हे अश्रु कशाला आतां
तुम्हि नका तापवूं चित्ता
हें मरण असे भाग्याचें ॥ हें गाणें फांसावरचें !

६

तो पृथ्विराज चौहाण ॥ आठवा तयाचें धैर्य
तो उदेपूरचा राणा ॥ आठवा तयाचें शौर्य
तो यादव शंकरदेव ॥ आठवा तयाचें कार्य
आठवा धन्य शिवबाला
आठवा वीर बाजीला
आठवाच तानाजीला
कर्तव्य ओळखा त्यांचें ॥ हें गाणें फांसावरचें !

७

स्वाभिमान पूर्ण त्यजुनी ॥ कीर्तीची होळी करुनी
कर्तव्यच्युत होवोनी ॥ कीं स्वार्थदृष्टि ठेवोनी
सत्कार्या विध्वंसोनी ॥ शत्रूस साह्य होऊनी
स्वकियांस वैरि समजोनी
वाग्बाण तीव्र योजोनी
विंधिती भ्रांत होवोनी
सत्पुत्र ते न देशाचे ॥ हें गाणें फांसावरचें !

८

कृतिजनक कालवश झाला ॥ तरि कार्य न मृत हो त्याचें
कार्यपूर्ति करणें हेंच ॥ कर्तव्य राहिलेल्यांचें
कर्तव्यमूढ होऊनी ॥ रडणें हें वीरा न रुचे
ध्येयावरि ठेवुनि दृष्टी
निर्भयें चालुनी पुढती
जो ध्येय गांठि त्या म्हणती
मांगल्य मूर्त देशाचें ॥ हें गाणें फांसावरचें !

९

निष्कामबुद्धि ठेवोनी ॥ देशकार्य करितां अरिचीं
आनिवार्य संकटें पुढतीं ॥ येवोत कितीही त्यांची
चिंता न लेशाही करितां ॥ करावी पूर्ति कार्याची
ओजस्वि ऋषी–सूक्तांनीं
तेजस्वि राष्ट्र-संतांनीं
प्रतिभायुत शाहीरांनीं
कथिलें तें ऐकायाचें । हें गाणें फांसावरचें !

१०

व्हायाचें होउनि जातें । कासया करावा शोक
अभिसार करुनि नव-युवक ॥ समरांगणिं पडले कितिक
धृतिला जो दाखवि धाक ॥ म्हणतात वीर त्या लोक
इतिहास साक्ष दे याची
धीरता हीच वीरांची
संपत्ति होय कीं साची
सांगणें असें ज्ञात्यांचें ॥ हें गाणें फांसावरचें !

११

द्या निरोप आतां मजला ॥ जातों मी सेवक पोर
मद्बांधव माझे पूर्वीं ॥ वैकुंठीं गेले वीर
हां चला करुं नका शोक ॥ देतील मला ते धीर
हे पहा तरी कीं दूत
घेऊनि पाश हस्तांत
सरसावुनि पुढति येत
मी त्यांचा समजायाचें ॥ हें गाणें फांसावरचें !

१२

हे पाश पहा मृत्यूचे ॥ आले हो आले जवळी
सोडुनी तुम्हांला आतां ॥ जाणार जीव आभाळीं
सहवास सुखाचा तुमचा ॥ ही अंतरण्याची पाळी
मीं राष्ट्र-कार्य करितांना
हरपण्या माझिया प्राणा
हें विघ्न मधें आलें ना
त्यालाहि तोंड द्यायाचें ॥ हें गाणें फांसावरचें !

१३

तुम्हि दूत जरासे थांबा ॥ आंवळूं नका हो फांस
एवढी एक पुरवावी ॥ ही अंतिम माझी आस
पाहूं दे डोळे भरुनि ॥ एकदां मायदेशास
हा प्रियतम माझा देश
या स्थलींच माझा वास
प्रेमाचा देई घांस
हें स्थान धर्मवीरांचें ॥ हें गाणें फांसावरचें !

१४

जन्मभूकडे माझ्या या ॥ लागली ओढ जीवाची
मृत्यूच्या मदीरांत ॥ ओढणी पहा दूतांची
विरोधि शक्ति-कैचींत ॥ जाचणी होय जीवाची
अंतिम हा श्वासोच्छ्वास
लागला मला हो खास
होणार पारखा देश
देशकार्य उरलें कैचें ! ॥ हें गाणें फांसावरचें !”

१५

या वेळीं करचरणांनो! ॥ विगलीत कशाला होतां
या अशा वेळिं नयनांनो ॥ हीं उघडझांप कां करितां
या समयाला अश्रूंनो ॥ डबडबुनी कां हो येतां
कां हृदया तूं धडधडसी ?
कां मना तूंहि हुरहुरसी ?
कां जिवा भीति आठविसी ?
कधिं तरी असें जाण्याचें ॥ हें गाणें फांसावरचें !

१६

सांगुनी असें बाळानें ॥ पाहिलें आत्मतेजाला
जोडिलें हात देवाला ॥ वंदिलें मायभूमीला
पूजिलें साधुसंतांना ॥ अठविलें देशभक्तांला
मृत्यूला दिधली मान
देशार्थ अर्पिले प्राण
तत्क्षणींच मिटले नयन
संपलें इथें वीराचें! ॥ हें गाणें फांसावरचें !

( छत्रपती संभाजीमहाराजांच्या वधानंतर दुभंगलेल्या महाराष्ट्रांतील एक प्रसंग. )

# रण-गीत

श्रीमंत विश्वासरावसाहेब पानिपताचे रणावर पडले त्या वेळीं रणभूमातेनें आपल्या वीर बालकास अशाच प्रकारचें गीत म्हटलें असेल काय ?—

( नीज गुणी० )

१

गातें मी अंगाई-गीत राजसा !
मम अंकीं शिर ठेवुनि झोंप शांतसा ! ॥ धृ० ॥
शत्रूशीं समर घोर करुनिया बळें
आर्यवीर रणतीर्थी पतन पावले
शूरपणा दाखवुनी अमर जाहले
धीर वीर असुनि मुला खिन्न कां असा ?

२

शस्त्रांचे घाय पडुनि अंग ठणकतें ?
क्षुधातृषा लागलि का ? काय वाटतें ?
सूर्यचंडकिरण तुला ताप देति ते
ध्यानिं मनीं येत नाहिं परी त्वदाशा !

३

तात बंधु भागिनि सर्व गृहीं राहिलीं
तव काया पडलि इथें आइवेगळी
प्रेमाच्या भेटि गांठि नाहिं या स्थलीं
या स्मरणें टाकीसी दुःख उसासा !

४

मृदु शय्या झोंपाया नाहिं आजला
म्हणुनी कां कंठिं तुझ्या खेद दाटला

कां रणघोषें निद्रा-भंग जाहला
चिंता आशी जडालि काय तुझ्या मानसा !

५

आक्रंदन रणिं चाले श्रवाणिं ऐकुनी
शिरकमलें तरतांना नयनिं पाहुनी
भीती कां घोर तुझ्या उपजली मनीं ?
कां पसरे भीषण ही तव मुखीं निशा ?

---

## श्रीमंत विश्वासरावांचें उत्तर

( निजरूपी जगदा० )

मृत्यु रणांगणिं लढतां आला ॥ दुःख न वाटे याचें मजला ! ॥ ध्रु० ॥
वीराला रणमृत्यु भूषवी ॥ नेई त्यातें मोक्षपदाला १
नश्वर काया केव्हांतरि या ॥ सोडुनि जायाची जगताला २
देशरक्षणा, धर्मरक्षणा ॥ स्वीकारीलें मी समराला ३
कार्यपूर्ति परि होण्यापूर्वी ॥ वश झालों मी या मृत्यूला ४
याच विचारें मानस माझें ॥ विवश जाहलें या समयाला ५

---

## श्रीशिवकालीन मराठे

( गज्जल )

मराठे वीर रण-शूर ॥ मराठे वीर रण-धीर ॥ ध्रु० ॥
अविंधीं महाराष्ट्र देश ॥ करूनी आपुला दास
मदानें तुडविला जेव्हां ॥ मराठे कोपले तेव्हां १

श्रीमत् शिवभूपतिसंगें ॥ मराठे लोटले संघें
'हरहरमहादेव' घोषें ॥ घुमविला देश आवेशें २
पूज्य स्वदेश ताराया ॥ पूज्य स्वधर्म रक्षाया
निजकरीं खड्ग घेवोनी ॥ रणांगणिं जात धावोनी ३
सोडुनी विलास-आनंद ॥ घेतला अरी-समर छंद
बसुनी चपल अशा तुरगीं ॥ रमले अरि-सैन्यीं रंगीं ४
इच्छिला सदा ऐक्यभाव ॥ नाणिलें मनीं द्वैतनांव
वागले प्रेमभरें सर्व ॥ कराया इष्ट देशकार्य ५
मानिला निरय पारतंत्र्य ॥ मानिला विभव स्वातंत्र्य
त्यजुनी व्यक्तिस्वार्थाला ॥ झटले स्वराज्यकार्याला ६
मायभूसेवक ते झाले ॥ परांच्या सेवेला विटले
दाविला खरा स्वाभिमान ॥ सोडवुनि दास्यांतुनि मान ७

---

## श्रीमंत पहिले बाजीराव

( स्रग्धरा )

१

वारोत्तंसा ! सुधीरा ! निजजनिभजका ! तेजसा ! बाजिराया !
तेजा पाहूनि तूझ्या विजय कमलजें स्वीय केलें रणीं या
शौर्यानें वाढवीली आखिल जनिं महाराष्ट्रदेशप्रकीर्ती
लोकांच्या रंध्ररंध्रीं स्फुरविलि तशि तूं दिव्यशी राष्ट्रभक्ती

२

युद्धीं तूं लोळवीलें प्रबल रिपुजनां तीव्रखड्गप्रहारें
भीतिग्रस्तांस मायें हृदयिं कवळुनी नाशिलें दुःख सारें

धर्मी कर्तव्य कर्मीं निरततरमती ठेवुनी कार्य केलें
राष्ट्रोत्कर्षास चित्त प्रतिदिवशिं तुझें फार होतें भुकेलें

३

त्वत्पुण्याई विशाला मजसि न कथवे कर्मयोगेश्वरा हे !
वीरांमाजी प्रतापी तुजसम विजयी वीर कोठेंच नोहे
उत्साहें आदरानें सुचरित अमृता तूझिया नित्य प्यावें
पुण्यश्लोका त्वदीया सुकृतमहतिला वंदितों प्रेमभावें

---

## देहरथ

(शा० वि०)

१

देहाचा रथ या विशाल भुवनीं येऊन कीं ठाकला
आत्मा हाच तयामधीं अधिपती बैसूनिया राहिला
याला हीं बघ इंद्रियें ढकलिण्या आहेत अश्वांपरी
हातीं चित्त लगाम घेउनि तशी सारथ्य बुद्धी करी

२

ज्याला हीं वश इंद्रियें असुनियां सुस्थीर ज्याचें मन
बुद्धीच्या चिमट्यांत राहुनि सदा ज्याचें असे वर्तन
त्याला ब्रम्हपदीं मिळे स्थल, जिथें आनंद चिन्मंगल
वर्ते स्वैर इतस्तता नर तया तें दुर्गतीचें स्थल

---

# आम्ही मराठे गडी

( शा० वि० )

१

राष्ट्रोद्धार करावयास झटले द्रेतीं न जे रंगले
उत्साहें बहु जीवनार्थ समरीं सत्कीर्तिनें गर्जले
ज्यांनीं ओढुनि काढिलींच रिपुच्या पोटांतलीं आंतडीं
प्रामुख्यें स्तवनास योग्य असती ते कीं मराठे गडी

२

गेलेलें मिळवूनि राज्य अपुलें जे सर्व लोकश्रुत
देशाला भुवनप्रसिद्ध विभवीं नेतील जे निश्चित
किंवा जीव समर्पितील समरीं देशार्थ जे आवडीं
आहे हा अधिकार त्यांस म्हणण्या ' आम्ही मराठे गडी '

---

# दगडाचा देव

## सुनीत

( शा. वि. )

होता प्रस्तर एक भव्य पडला मार्गीं गिरीखालती
येतां चालुनि पांथ सन्निध तया वक्रोक्तिनें बोलती
जन्मा येउनियां निरर्थक तुवां या भूवरी प्रस्तरा
नाहीं रम्यपणा, त्वदंगिं गुणही संस्तुत्य ऐसा खरा
होता हा क्रम यापरी सुरु तिथें पांथादिकांचा सदा
कोणी नाहिं विशेषशी परि मनीं केली चिकित्सा कदा

ये एके दिवशीं परी सहज तो शिल्पज्ञदृष्टी-पथीं
तेंव्हां तन्मनिं कल्पना विकसुनी वृद्धिंगता होय ती!
शिल्पज्ञें स्वकरें सुमूर्ति घडिली त्या प्रस्तरापासुनी
एका सुंदर मंदिरीं बसविली ग्रामामधें नेउनी

आला देवपणा सुमंगलपणा तेथें तिला संप्रती
लोटे दर्शन घ्यावयास जनसंभार प्रतीक्षाप्रती
या लोकांत गुणीगुणज्ञ घडतां संयोग हा मंगळ
साकल्यें गुण थोरवी प्रकटते सिद्धांत हा प्रांजल

---

## उदयास्त

( स्रग्धरा )

१

प्रातःकाळीं क्षितीजावरि अभिनवसा बालभानु प्रकाशे
पौरस्त्य प्रांत होई विमल, नभिं उषा बालिका चारु हांसे
ब्रह्मांडाची सुषुप्ति प्रलयतर अशी पूर्ण जाई लयास
" होई सिंहापुढें कीं हतबल अगदीं दुष्ट उन्मत्त रीस "

२

भूमीला ताप देई हळुहळु तरणी टाकुनीया विवेक
लोकप्रीती हरी हा, दिवसमुखयशा लावुनीयां कलंक
शांतीशीं वक्र होई खलमति उपजे अंतरीं विप्रकृत्या
" ज्ञाताहि आधिपत्या प्रतिभुरळुनियां इच्छितो सत्य-हत्या "

३

आकाशीं उच्च जागीं अढळ पद खरें प्राप्त झालें म्हणोनी
अत्युग्र श्वास सोडी जन विकल करी अंशुरूपी शरांनीं
साक्षात् कल्पांत मांडी अधिनृपरवि हा गाजवी राजसत्ता
होती संत्रस्त तेणें भुवनजन अतीं साहवेना अ-शीता

४

उच्च स्थानीं नभीं जो रविनृप बसुनी चालवी आधिपत्य
त्याचेंही तें टिकेना अनुभव जगतीं येई सर्वांस नित्य
कालाची वक्रदृष्टी अवचित वळुनि त्यावरी क्रूरशा ते
स्वस्थानापासुनी तो हळुहळु उतरे खालती खिन्न-चित्तें

५

येई म्लानत्व, सत्ता-बिभव-विलय हा त्याजला पाहुनीया
वाटे लज्जा तयाला मलिन-मुख जगा आपुले दाखवाया
जाई अस्ताचलाच्या तममय विपिनीं राहण्याला म्हणून
" कालाची कोणि सत्तागति वळुं न शके शस्त्रहातीं धरून "

६

कोणाला दैवयोगें अधिपपद जरी प्राप्त झालें जगांत
आहे तेंही अनित्य प्रतिदिनिं अपुल्या वागवावें मनांत
जोडावें पुण्य, व्हावें प्रिय सकल जनां आपुल्या सत्कृतीनें
सद्वाणीनें रमावें प्रभुपदकमलीं सर्वदा-सु-व्रतानें

# शारदेस

( गीत )

१

वंदन तव चरणिं असो देवि शारदे ! ध्रु०

शुद्ध भाव उन्नत करि
शांति-सौख्य जी पसरी
ज्ञानसरित् हृदयांतरिं
नित्य वाहुं दे !

२

तुझी कृपादृष्टि वळुन
दिव्य तेज किरण मिळुन
ज्ञानकमल मधु विकसन
चित्तिं होऊं दे !

३

हृदंतरी सद्विचार
खेळुं देत अति स्वैर
सुमति जोड त्यां सुंदर
नित्य लाभूं दे

४

वाणीनें मधुर बोल
येउं देत तरल सरल

त्रिखनास कर अविरल
सिद्ध होउं दे

५

तुझें नाम-चिंतनांत
जावो हा काळ संतत
आनंद स्वरूपांत
वृत्ति लोपुं दे

---

## पंजरवासी शुक

( पंजरवासी शुक झाडावरील आपल्या बंधुशीं बोलत आहे हा काव्यप्रसंग )

( दिंडी )

हाय ! दैवानें करुनि असा घात !
दास्य-पंजरिं लोटिलें अकस्मात !
तुटुनि तारा भूवरी आदळावा
स्थिती माझी तशि होय शुका देवा १
नको राया हा कठिण बंदिवास
विंचु डसले मम सारखे जिवास
वेदनांनीं तडफडे जीव भारी
दृश्य पाहुनि ढाळिती अश्रु वैरी २
खड्ग-धारा सहवेल एक वेळ
काल-कूटहि एकदां पीववेल

परी परवशता क्षणहि सोसवेना
हृदय जाळी देउनी क्लेश नाना ३

जिथें केला मुक्त मी विहार
तिथें ठरलों हतभागि आणि चोर
जरी असलों या स्थलीं मी जिवंत
मृतासम या जगीं जिणें व्यर्थ ४

( सवया )

नियमित जागा नियमित फिरणें नियमित नित बोलावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! ५
स्वामी देइल तितुकें खाणें पाणी पिउनि असावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! ६
फडफड करुनी पंख पुन्हा मी एका जागीं बसावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! ७
स्वकीय किंवा परकी कुणिही त्यानें मज टोंचावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावे ! ८
पंजर मम हा ब्रह्मगोल हें चित्तीं मीं समजावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! ९
अन्यायाला न्याय समजुनी आनंदें मिरवावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! १०
शत्रूलाही मित्र समजुनी प्रेमें त्यास भजावें
स्वातंत्र्याचें वन सुखकारी नाहीं मजला ठावें ! ११

# माझाच बाळ कां नेला !

( आजि शेवटचा० )

१

रे ! घालुनियां निर्दय काळा घाला !
माझाच बाळ कां नेला ॥ ध्रु० ॥

कीं माझा हा प्राण-विसावा होता !
या तापद सृष्टीवरता ॥
मी बाळाला आतां कोठें पाहूं !
हें दुःख कसें तरि साहूं
जें वज्राहूनि कठीण
जें मरणाहूनि भयाण
तें असलें कठोर विघ्न
माझ्या वरती टाकुनियां गेहाला
माझाच बाळ कां नेला

२

या भूमिवरी पराधीन सर्वस्वी
स्फूर्तिची ज्योत ना जीवीं
मद्भाग्याचे दिवस निघूनी गेले
दारिद्र्य घराला आलें
मी घरोघरीं भिकारीण भिक्षेला
मागण्या जाइं पोटाला

परि अशाहि संकटसमयीं
बाळाला धरुनी हृदयीं
सुख मानित होतें गेहीं
दुर्हेतु: परी कुठुनी सुचला तुजला
माझाच बाळ कां नेला

३

मम दीनपणा पाहुनि मनिं कळवळला
निष्कामयोग आचरिला
गत इतिहासा पुनरुज्जीवित केला
जो वीररसीं नटलेला
मम दीनेला दुःखांतुनि काढाया
जो निशिदिनि झिजवी काया
होईल सुखाची प्राप्ती
मज आशा वाटत होती
तोडुनी परी ती पुरती
तुज लाभ असा यांत काय तरि झाला
माझाच बाळ कां नेला !

४

गत जन्माचें पाप आडवें आलें
कीं भोग अजुनि ना सरले
ना कांहिं कळे हेंचि आज बुद्धीला
जीवही होय मम दुबळा

कुणि होइल तो होवो मज ताराया
परि दीन स्थिति घडिला या
मी दुर्बल बघुनि जगतीं
उपहासें परजन हंसती
तन्मोदा येण्या भरती
ही युक्ति तुवां रचिली ठेवुनी डोळा
माझाच बाळ कां नेला!

---

## कैसा म्हणूं ब्राह्मण !

### ( सुनीत )

विद्या धर्म तपः क्षमा सदयता विश्वेशभक्ति स्पृहा
मानोनी विषवत् स्वाचित्तिं, रमतो जो वारनारी गृहा
लोकीं जें अति निंद्य कर्म म्हणुनी सर्वत्र धिक्कारिलें
मद्य-प्राशन कर्म तें करुनियां नीतीस उच्छेदिलें १
अन्यांना वश होउनी स्वजनिशीं दावा उभा मांडिला
स्वत्वा नोळखुनी निरर्थक जयें श्वाधर्म आलंबिला
व्हावी संस्तुति भूपसेवकगृहीं इच्छा अदम्या मनीं
सन्मार्गी निजदेशबंधु कुवचें जो ताडितो बोलुनी २
लोभानें अथवा अकारण जयें साक्षी असद् देउनि
लोकांचे शिरिं घेतले कितितरी कीं शाप हे दाटुनी
भक्षाभक्ष विचार हा न करितां जें आयतेंसें मिळे
कोंबूनी जठरीं क्षुधा शमवि जो इच्छेपरी आपुले ३

## अन्योक्ति

( शा० वि० )

ऐकोनी वनराज शब्द विपिनीं, जो कंप देई धरे
स्वस्वामी अधिकार कक्षि बसुनी श्वाना तुवा भुंक रे !
मुक्त प्रांतिं विशाल गांठ पडतां त्या केसरीशीं परी
सर्वांगीण परान्नजीवित तुझें वाक्शौर्य भीतीवरी
आहे घोर तमिस्रयुक्त रजनी दिग्मंडळीं जोंवरी
घू घू घू स्वन चालु जदे तरुवरी घूका तुझा तोंवरी
येतां हा उदया सहस्रकर, तूं ढोलीं दडि घेशिल
' विद्वत्तेज बघूनि मूढ दिपती ' सिद्धांत हा प्रांजल
श्रेष्ठ स्थान मिळो असा निज मनीं हेतू धरूनी दृढ
आनंदें अति काव काव करूनी काका तुवां ओरड
देखोनी परि राजहंस जन हे त्यालाच सत्कारिती
काकानें जरि राजहंस म्हटलें कोणी न त्या मानिती

---

## गतकालीन भारत

( शा० वि० )

१

भाग्याचा रवि भालदेशिं विलसे या भारताच्या महा
तेव्हांचें सुख काय वर्णुं ! रसना ना शक्त माझी अहा !
या साऱ्या जगतांत उच्चपद पावोनी महामंडित
स्वातंत्र्यांत महोन्नत प्रभुकृपें होता सुखी भारत

२

विद्या धर्म सुधी पराक्रम महा साहित्यशास्त्रें कला
यांचा कीं परमोच्च संगम पुरा होता इथें जाहला
होतीं वैभवयुक्त निर्भर धनागारें पुरीं उन्नत
होते नांदत ते सुभव्य सुषमा प्रासाद धारायुत

३

ज्यांची बुद्धि विशाल, तेज चमके सावित्र नेत्रांतुनी
वाणी ओजयुता स्वयें प्रकटली आसक्त सूक्तांतुनी
स्वीकारूनि निरिच्छ वृत्ति हृदयीं आराधिला ईश्वर
होते सत्वगुणीं तपोधन इथें ब्रह्मर्षि धर्मचर

४

ज्यांची कीर्ति यशध्वजा फडफडे या भव्यदिङ्मंडळीं
शौर्यानें निज पावले प्रथितशा मानास भूमंडळीं
धर्मीं तत्पर राजकीय नियमीं तैसे प्रजापालनीं
होते शोभत शासनीय नृपती स्वातंत्र्य-सिंहासनीं

५

बाहू स्पंदन पावले रिपुवधा उत्साह हृन्मंदिरीं
आर्जीशास्त्रविशारद प्रमुखसे कांती तशी साजिरी
दीनोद्धारक सत्यसंघ निजभूसेवाग्रणी निर्भय
होते संगर सूर्यवीर विनयी स्वातंत्र्य ज्यांना प्रिय

# कां घाव घालिसी

( अजि शेवटचा॰ )

१

या स्वर्लोकीं कल्पवृक्ष बहु असती
देवांस देति सुखशांति
तें नंदनवन शयनस्थल अमरांचें
सौन्दर्य जयामधिं साचें
त्या स्थलीं मुदें लास्य अप्सरा करिती
गंधर्व मधुरतर गाती
तारका फूलें भवतालीं
दिनिंरात्रिं असति फुललेलीं
त्यामुळें चारुता आली
ऐश्वर्य असें नटलें स्वर्गावरती
साश्चर्यें मानव बघती

२

हा आम्रतरू मृत्युलोकिंचा कल्प
जरि मोलीं दिसला अल्प
हे वृक्ष जरी नयनां मोठे दिसती
या वेली नाजुक असती
मानवजन कितिकांची पूजा करिती
गुण महिमा कोणी गाती
जे निसर्ग सद्गुण यांत
भरलें कीं ओतप्रोत
तें नसती परि इतरांत

हा वृक्ष असे मंगल भू-गोलाला
ना उपमा दुसरी याला

३

प्रवासी श्रमी येति शीत छायेला
चुकविण्या तीव्र तापाला
या लोकिं खरा आश्रम हा विहगांचा
हा ठेवा सकल गुणांचा
सौन्दर्य पहा वसंतसमयीं याचें
साम्राज्य पसरि मोदाचें
कोकीळ सारिका कीर
मधु आम्रासव आहार
करुनियां खेळती स्वैर
स्वातंत्र्य असें जिवांस या तरुवरती
प्रत्यहीं मिळें सुखशांती

४

मानवा, अशा दुर्लभ वृक्षावरती
कां घाव घालिसी हातीं
या हृदयिं तुझ्या दया मुळीं का नुरली
प्रीतिहि मनींची मेली
हा मूक जरी ज्ञान असे यच्चित्तीं
सुखदुःखें याला कळती
अंगांत तुझ्या जर शक्ती

जे तुजसम योद्धे जगतीं
दाखीव तयांना भीती
तूं वीर जरी वीरपणाची करणी
कर भूषविते जी भुवनीं

## देव आणि भक्त

(अभंग)

सर्व प्राणीमात्रां ॥ आहे तो समान
प्रियाऽप्रिय हें न ॥ त्याचे ठायीं १
भक्तीनें भजती ॥ भक्त ते देवाचे
देवही तयांचे ॥ हृदयीं वसे २
अनन्य भावानें ॥ मोठा दुराचारी
दैवभक्ती करी ॥ तोहि भक्त ३
कारण तयाच्या ॥ बुद्धीचा निश्चय
म्हणुनी तो प्रीय ॥ होय देवा ४
आधिकारी होतो ॥ शाश्वत सुखाचा।
भक्त ईश्वराचा ॥ वैकुंठीं जा ५

## अस्पृश्य कोण ?

(शा. वि.)

१

झाला श्रेष्ठ कुलांत जन्म, अवघें सौंदर्य ज्या लाभलें,
देहामाजि सशक्तता, रमवितें माधर्य वाणींतलें,

हट्टानें त्यजुनी सुनीति परि जो होई सु-सत्त्वच्युत
तो अस्पृश्य खरोखरीच जगतीं, या सर्व लोकांप्रत

२

विद्यालाभ जयास सर्व परिंनीं उत्कृष्टसा जाहला
ग्रंथोत्पत्ति करावयास मतिही आहे जया उज्वला
ग्रंथांना परि दूर लोटुनि सदा जो स्वार्थ पाहातसे
तो अस्पृश्य खरोखरीच जगतीं, श्रेष्ठत्व त्याला नसे

३

दैवानें धनलाभ ज्यास घडला आहे कुबेरापरी
सत्कार्यें करण्यास नित्य नियमें आहे सु-संधी घरीं
या लोकीं परि दुष्ट कर्म करि जो द्रव्यास कीं देउन
तो अस्पृश्य खरोखरीच जगतीं त्याचें नको दर्शन

४

सत्ता हातिं असे सहाय्य करण्या जे गांजलेले तयां
सत्यासत्य परीक्षुनी नय खरा लोकांप्रती द्यावया
दीनांना परि दुःख दे उगिच कीं जो मत्त होऊनिया
तो अस्पृश्य खरोखरीच जगतीं हें सांगुं मी कासया !

पाहोनी अति हीन ही स्थिति अशी उद्विग्न पावे मन
जन्मा ब्रह्मकुलांत ये तरि अशा 'कैसा म्हणूं ब्राह्मण'

---

## शनिवार-वाडा पाहून

### ( हृदयविदारक वार्ता० )

१

सांप्रत काळीं करुण स्थिति या वाड्याची बघुनी
अश्रु येती नयनीं॥ उठतीं विचार नाना मनीं ॥ ध्रु० ॥

गतविभवाचीं डोळयांपुढती
नयनमनोहर चित्रें दिसती
'चित्रपटापरि परि तीं जातीं
झरझर धांवोनी ॥ उठती० ॥

२

पूर्वाश्रमिचें वैभव गेलें
त्या जागेचें स्मशान झालें
वातावरणहि पूर्णचि भरलें
भयद भेसुरांनीं ॥ उठती० ॥

३

शत वर्षांच्या मागिल काळीं
माणिकमोतीं जिथें उधळलीं
अशा स्थळाची माती झाली
काळाची करणी ॥ उठती० ॥

४

शिवशाहीचें पवित्र वैभव
भगवा झेंडा जेथें फडकत
यशोदुंदुभी तैशा वाजत
राष्ट्र-राजधानी ॥ उठती० ॥

५

जेथें वीर ध्वनी गर्जती
तोफांचे ध्वनि गगन फाडिती
त्या स्थानाला आली भींती
ही स्थिति येवोनी ॥ उठती० ॥

६

हत्ती घोडे उडवित गेले
बलशालीही रिपु पळवीले
स्वातंत्र्यास्तव रणीं झुंजले
कुठें वीराग्रणी ? ॥ उठती० ॥

७

प्रीती ज्यांची राष्ट्रावरती
पाहुनि रिपु ज्यां थरथर कांपति
धीर वीर ते बाजि राहती
याच याच सदनीं ॥ उठती० ॥

८

वसईवरती झाली स्वारी
अटके गेले राघु भरारी

भाऊ गेले पानिपतावारि
याच सदनांतुनी ॥ उठती० ॥

९

महाराष्ट्राच्या भूमीवरती
गतविभवाचीं चित्रें दिसती
ऐशीं स्थानें कितीक असती
त्यांना पाहोनी ॥ उठती० ॥

---

## नमस्कार

( चंद्रकांत० )

अधर्मांतका ! धर्मरक्षका ! महाराष्ट्रभूपा !
देशरक्षका ! बलोत्पादका ! क्षात्रियकुलदीपा !
जडाजडाला अभिनवमंडित जीवकला दिधली
स्वातंत्र्योन्मुख देश करुनिया स्फुर्ती चेतविली
संग्रामाचा ऐक्यशक्तिचा सांगुनि संदेश
दासत्वांतुनि उद्धरिला हा महाराष्ट्र देश
आज सहर्षें उत्सव करिती जनपद, शिवराजा
प्रेमें घ्यावा प्रेमाचा हा नमस्कार माझा

# उलटा न्याय

( शा० वि० )

१

प्रेमाब्धि प्रभुचें ज्यांस जगतीं व्हावें गमे दर्शन
साधूंनी कथिला सुमार्ग मनुजां ' सप्रेम संकीर्तन
लोकांची विपरीत रीत परि मी वर्णुं अहा काय ती
प्राण्यांचे बळि देउनि प्रभुस हे भेटावया पाहती !

२

प्रेमानें, मधु–भाषणें, अ-कपटें स्वातंत्र्य संगोपनें
अन्योन्यांत सखित्व राहि जगतीं हें सांगणें ना उणें
लोकाचार गमे परंतु उलटा हा तत्वतां पाहतां
क्रौर्यें वा असिनें प्रयत्न करिती राखावया मित्रता

३

एकाद्या धनवान् समर्थ मनुजें वेश्या गृहीं पाळुनी
बारामासहि नाचरंगिं रमला; तो मान्य होतो जनीं
ऐके निर्धन मार्गि राहुनि जरी वारांगना-गायन
हां ! हां ! हा व्यभिचारी, ऐशि करिती त्याची टवाळी जन

४

खोटे कागद लेखुनी फसवुनी साक्षी असद् देउनी
वेळीं खून करूनि वित्त मिळवी तो सभ्य होतो जनीं
ज्यानें धान्य पसाभरी उचलिलें पोटार्थ राशींतलें
ऐसा निर्धन मात्र ' चोर ' ठरवी त्या निंदिती हे भले

५

वाटे ही रसहीनशीच मधुरा साक्षात् जयाला सुधा
स्वाद्वन्नें परमाग्रहेंच पडती ताटीं तयाच्या सदा
अन्नावांचुनि जो परी तळमळे चिंताग्नि योगें जळे
पक्वान्नें कुठलीं ? तयास न कण्याकोंडाहि खाया मिळे

६

धर्मग्रंथ मुखामध्यें असुनियां आहे तशी श्री–कृपा
वाणीमाजि रसाळता, वळविण्या सामर्थ्य आहे नृपा
स्वच्छंदी परि वागणें, कृति तशी ती घातकी तापद
धिक्कारे स्वजनां दुरी ढकलुनी घेई परां सन्निध

७

दुष्कर्मे करि राजरोस जगतीं जो अल्पही ना भितां
तीं डोळीं उघडया बघूनिहि सुधी देती तया धन्यता
सत्यान्वेषण-बुद्धिनें अनयता जो दाखवी बोलुनी
त्याचा मत्सर मात्र तीव्र करिती धर्मज्ञही कोपुनी

८

गंगा शुभ्रजला हिमालयसुता पुण्यप्रदा मंगला
नाशी पाप विशेष कीर्ति जगतीं आहे हिची उज्ज्वला
भेटाया परि हीस दक्षिणपथें जाती मनुष्यें किती
मार्गीं त्यांस कुठें दिसे जरि झरी गंगा तिला बोलती

९

धेनूला अवमानुनी, सुखभरें श्वानास आलिंगिती
काका घालिति पुष्पहार समुदें हंसास धिक्कारिती

रत्नें फेंकुनि देति दूर, हृदयीं कांचा सु-संमानुनी
लोकांचा व्यवहारिं न्याय उलटा ऐसा दिसे या जनीं

---

## आत्मस्वातंत्र्य

(श्लोक)

१

मनुष्यें स्वयें आपणा उद्धरावें
स्वताला स्वतां ना कधीं भीववावें
असे साह्यकर्ता स्वताला स्वतांच
जगीं शत्रु तैसा स्वताला स्वताच

२

जयानें स्वताला स्वतां जिंकिलें कीं
स्वताचा सखा होय तो मात्र लोकीं
स्वताची परी ज्यास जाणीव नाहीं
स्वताचा स्वता तो खरा शत्रु होई

---

## स्वातंत्र्य कोणा मिळे ?

(शा० वि०)

१

रात्रंदीस सुखांत राहुनि, मऊ शय्येवरी लोळुनी
स्वाद्वन्नें तरि सेवुनी, युवतिशीं गोष्टी सदा बोलुनी

नाना वेश विभूषणीं नटुनियां दासत्ववृत्तीमुळें
किंवा सुंदर नाचरंग करुनी ' स्वातंत्र्य कोणा मिळे ? '

२

घोडे कागदि नाचवूनि अथवा माध्वीपरी बोलुनी
जागोजाग फुका निषेध करुनी, उद्योग धिक्कारुनी
स्वार्थाला कवटाळुनी, सरलता सत्शब्द धर्मच्छलें
किंवा भेदकभाव ठेवुनि मनीं ' स्वातंत्र्य कोणा मिळे ?

३

स्पर्ध्याशीं सहकारिता करुनियां राहूनियां हांसत
हांजीखोरपणा करूनि अथवा बैसूनियां खेळत
भिक्षावृत्ति धरूनि वा फिरवुनी शिष्टाइचीं मंडळें
किंवा मेळवुनी नृपाल-पदव्या ' स्वातंत्र्य कोणा मिळे ? '

४

ऐक्यावांचुनि, पौरुषाविण, तसे निष्काम कर्माविना
धर्मावांचुनि देशकार्यविषयीं अत्यंत भक्तीविना
किं विद्यालयिं नाटकें करुनियां, निर्भेळ सत्त्वामुळें
तैसें ईशकृपाबलाविण जगीं ' स्वातंत्र्य कोणा मिळे ? '

---

## पूर्वज-पराक्रम

( गीति )

१

प्राचीन पूर्वजांनीं जेथें विक्रम महानसे केले
देवांनीं असुरांच्या स्वाऱ्यांपासूनि जीस वांचविलें

गो-अश्वादि प्राणी यांना स्थल जी विशेषसें देते
ती मातृभूमि अमुची देवो ऐश्वर्य तेज आम्हांतें

---

## कवीचें गाणें

( जरि नाहिं कमल तें करीं० )

कवि मुरली हा वाजवी ।। चित्त रंजवी
गाउनी गाणीं ।। जगतास टाकि मोहोनी १
नवनवे राग गाउनी ।। भाव निर्मुनी
चारु लास्याचें ।। जग त्यावरी नाचवि साचें २
जें दिसे कवीच्या मना ।। तसें लोचनां
त्यास रंगवी ।। काव्यांत माधुरी दावी ३
दाखवी स्वर्ग भूवरी ।। भूमि अंबरीं
शब्द चातुर्यें ।। शृंगार रसादिक कार्यें ४
विकाळ रूप सागरीं ।। घोर कंदरीं
फिरे निःशंक ।। जगताला धुंडाळीत ५
मूकांस जगीं या कवी ।। पहा बोलवी
नवल हें असलें ।। कंठांत कवीच्या बसलें ६
दुःखाग्नित जळत्या जिवा ।। मोद दे नवा
मधुर कवनांहीं ।। निपजवी शांतता हृदयीं ७
दास्यीं मृत ज्यांचे मन ।। नवें जीवन
ओति तद्हृदयीं ।। मधु ऊर्जस्वल गीतांहीं ८

---

# आत्मानुभव

( शिखरिणी )

१

मनाचा जो आहे बळकट अती भूमिधरसा
असे आचारानें प्रयत अति सत्यव्रत तसा
जितात्मन् जो झाला यमनियमयोगाश्रयबळें
तयाला हा आत्मानुभव जगतीं मंगल मिळे

---

# बलवंतास

( पृथ्वी )

१

नमस्य बलवंत ! हे भरतवर्षवासी जन
सभाव करिती त्वदीय शुभनाम-संकीर्तन
अगाध महिमा तुझा मज न वर्णवे हें खरें
लिहूं मग कसा तुझा स्तवन-लेख माझ्या करें !

२

स्वराज्य-समरीं जसा विजयशील लोकाग्रणी
सरस्वति गृहीं तसा सकल-मान्य विद्वन्मणी
सदुच्च तव वर्तन प्रयत नव्य हृद्भावना
तशी अनुपमेय कीं निज जनीं दयावीक्षणा

३

भितां न लवही छळा, कुमति-लोक-निंदेस वा
सदैव झटलास कीं भरतभूमिसाठीं तुवां

मराठी ग्रं... ...ालय ठाणे
दा. क्र. ३८३५
...ांक ... (स्थळ

स्वराज्य-घटना असे सकल विश्रुता या जनीं
विशेष कथुं मीं कशास तव थोरता बोलुनी ?

४

परी त्वदुपकार, जें ऋण घडे आम्हां याचकां
स्वराज्यधन, तें दिल्याविण फिटेल संपूर्ण का !
भले न म्हणती कुणास ऋण मुक्त झाल्याविणें
महापतित ते जगीं मनुज धिक् तयांचें जिणें

---

## मायभूमि

१

सत्यं दीक्षा सुकर्मन् ऋत सहनपणा ज्ञानविज्ञान कार्य
होतें सातां गुणांनीं प्रमुखतर अशा मायभू-रक्ष-कार्य
हीं तीन्ही काल-वस्तु-स्थिति दमन करी आमुची मायभूमी
यासाठीं ती अम्हांतें अपरिमित असें देउं दे स्थान नामी

---

## शांती खरी लाभली

### ( सुनीत )

झालों त्रस्त अतीव होरपळुनी संसारतापानलीं
शोधाया मृदु शांतता कितीतरी मी हिंडलों भूतलीं
सिंधूच्या तटिं शांत-मंद लहरी पाहात मी बैसलों
अंतःशांति परी मिळे न म्हणुनी तेथून माघारलों १

गेलों मी गिरिशृंगिं तेथ जवळी भव्या शिला पाहिली
आशेनें मग बैसलों तिजवरी कोणी नसे त्या स्थलीं
सृष्टीची रमणीयता चहुंकडे आलोकिली दिव्यशी
लागे लक्ष न होय ती परि कटू कंटाळवाणी मशीं २
संध्या-रम्य विलोकिली शशिकला लावण्यलीलाखनी
खेळे जी क्षितिं चंद्रिका अभिनवा सौंदर्यसौदामिनी
तारांचीं कमलें प्रफुल्ल दिसलीं आकाशगंगेतलीं
थारीं चित्त न ये म्हणून जडशा आलों गृहीं पाउलीं ३
गेलों वाचन-मंदिरीं हळुहळु ग्रंथावली वाचिली
काव्य-ग्रंथिं मनोरमा सुरसशी शांती खरी लाभली ४

---

## कवि आणि अरसिक

### ( सुनीत )

रे! रे! आटप काव्यगायन कसें आतां तुझें हें कवे!
माझें चित्त रिझे न हें, दुरि पळे कानीं न तें ऐकवे
काव्यें सर्व मला निरर्थ दिसती निःसार निर्वाच्य तीं
कोणी श्रेष्ठ ह्मणोत काव्य कवि यां, माझी न त्या संमती
ग्रंथांवांचुनियां कुठें अरसिका! स्वारस्य तूतें गमे
कीं जेथें तव चित्त 'पद्म-अलिवत्' उत्कंठतेनें रमे
साधू-त्रासुनि चौर्यकर्म करुनी वेश्यागृहीं राहुनी
होई का तव चित्तरंजन? मला तूं सांग रे! बोलुनी
विद्येचा नयनीतिचा न घडला संस्कार चित्तावरी
ग्राह्याग्राह्य न भेद हा तुज कळे मी काय सांगूं तरी

पात्रीं सुंदर घालुनी मधुरसा ज्या ठेविला पायस
जाणे त्यांतिल तत्वता मधुरता जो हंस ना वायस
काव्याला कुणि निंदिलें अरसिकें अप्रीय मानूनियां
काव्याची महनीयता मधुरता जाईल का ती लया ?

---

# आपले कोण ?

( शिखरिणी )

१

करीं दोन्ही देती निज धन अ-सत्कार्य करण्या
सुवर्णाच्या मुद्रा उडविति सुरापान करण्या
विपत्कालीं ज्यांनीं लवहि दुबळ्यां अन्न न दिलें
अशा श्रीमंतांचें मुख न बघणें ते न अपले

२

परांच्या सेवेला तनमनधनें उत्सुक सदा
स्वकीयांना पायीं तुडविति मुदें संतत मुदा
स्वदेशाला ज्यांही इहनिरय डोहीं बुडविलें
अशा विद्वानांचें स्मरणहि नको ते न अपुले

३

स्वदेशाशीं ज्यांनीं उघड रितिनें वैर धरिलें
स्वतांच्या स्वार्थाला अनयकृतिनीं नित्य झटले
स्वकीयांचे ज्यांनीं विसरुनि दया कंठ चिरिले
अशा या वीरांचें स्मरणहि नको ते न अपुले

५

धृती नीती शांती धरुनि हृदयीं वागति सदा
विपत्कालीं सुद्धां चळत न मतीनिग्रह कदा
परांच्या ऐश्वर्या बघुनि न मुळीं जे भुरळले
स्वदेशा ताराया सतत झिजती तेच अपुले

---

## पावसाळा

### ( श्लोक )

येतां सरोनि कुसुमाकर पावसाळा ॥ आकाशमार्गिं फिरती नवमेघमाला
सों सों सुटे करित दक्षिणदेश·वारा ॥ भूमीवरी सतत ओतति तोयधारा १
भीतिप्रदा गगनिं या घनगर्जना हो ॥ विद्युत् नभांगणिं तशी करि नृत्य लाहो
प्रक्षोभुनी उठवि उंच समुद्र लाटा ॥ फेसाळता पसरि विस्मयकारि कांठा २
डोळे वटारित नद्या भरुनी वहाती ॥ झाडें मुळासकट वाहुनि त्यांत येती
होई समस्त जलमग्न तटप्रदेश ॥ वाटे तटस्थित भयावहता जनांस ३
रानींवनीं करिति कर्कश शद्ब कीट ॥ खद्योत दाविति तरूवरि लुकलुकाट
जाती विलोपुनि तसे नभिं सर्व तारे ॥ रात्री भयानक दिसे प्रबलांधकारें ४
भूमीस फाळिति कृषीवल नांगरानें ॥ पेरीति तींत सुमुदें नव बींबियाणें
जी जीव-जीवन तशी परिपूर्ण कामीं ॥ देई अम्हांस नवधान्य समंत भूमी ५

---

# असें कां ?

( शिखरिणी )

१

जिथें जन्मा येती शिशुपण जिथें भोगिति असे
जरी भाऊ भाऊ तरुणपणिं ते नांदति कसे ?
महा ऐश्वर्याच्या गिरिशिरिं दिसे एक भुवनीं
कढे दुःखामाजी सतत दुसरा हाय करुनी

२

पहा या उद्यानीं अरुण--समयाला प्रतिदिनीं
रहाती थाटानें विविध कलिका पूर्ण फुलुनी
परी पुण्यस्थानीं प्रभुपदिं कुणी मात्र वसती
कुणी शृंगारीती मृत तनु कुणी तेथ सुकती

३

पहा खाणीमाजी दगड निघती खोदुनि किती
परी त्यांच्यामध्यें दिसत समता नाहिं जगतीं
सुमूर्ती कांहींच्या घडति किति कां ये प्रभुपणा
मिळे भूपृष्ठीं या निरयगति निंदास्पद कुणा

४

पयोदापासूनी धरणिवरती तोय पडतें
तदा त्याच्याठायीं सतत समता पूर्ण दिसते
जरी गंगेचें तें उदक पतितां पावन करी
कसे गंगातीरीं पतित ! सुमती निर्झर तिरीं ?

[stamp]

५

जयाची विद्वत्ता गुरुसम तशी बुद्धिहि बरी
परी तोही रूढे धनद अधिकारावरि जरी
अहंकारानें तो सकल जनता तुच्छ समजे
असें कां हें होतें ? मजसि रसिका नैव उमजे

---

## उद्यम–महति

( वसंततिलक )

स्वातंत्र्यवेष्टित अशा गृहवैभवांत
जे लोक भूमिवरि संप्रति नांदतात
दीर्घ प्रयत्न अधिदैवत मानुनीया
झाले खरोखर सुखी जगतावरी या १

विद्वन्मणी अजवरी जगिं गाजले जे
ज्यांच्या शिरीं धवल-कीर्ति-तुरा विराजे
ते उद्यमीं निशिदिनीं रममाण झाले
"कष्टाविना फल जगांत कुणा मिळालें ?" २

इंग्लंड जें अजि पुढें दिसतें तुह्मांला
उद्योग कारण असे विभवोन्नतीला
नाना कलागृहविशेष्य अमेरिका ही
दीर्घोद्यमें जग-शिरोमणि होय पाही ३

स्वातंत्र्य-शैल-शिखरावरचा जपान
अल्पावधींत बनला समरप्रवीण

उद्योगवृत्ति धरिली म्हणुनी तयाला
ही मान्यता मिळुनियां जणिं धन्य झाला ४

श्रीमन्महा शिवनृपें सततोद्यमानें
स्वातंत्र्य-लक्ष्मि मिळविलि महाप्रयत्नें
साहून कष्ट जहरी तिलक प्रभूनें
निष्काम-कर्म-महती कथिली कृतीनें ५

मुंग्या स्वकष्ट करुनी मिळवीति धान्य
ते भृंग सांठवुनिया मधु, घेति पुण्य
तंतू पहा जमवुनि विणिती गृहांतें
पक्षी किती करिती संतत उद्यमातें ६

एकेक बिंदु जमुनी घन-पंक्ति होती
तैसेच मृत्कण जमूनहि अद्रि होती
कार्यें सभाव करितां जरि थोडथोडीं
त्यांचा प्रचंड समुदाय यशास जोडी ७

---

## माझा देश मला—

( शा० बि० )

दुर्दैवें जरि पारतंत्र्य-अनलीं हा देश माझा असे
नाना क्लेशशरीं विदारुनि जरी संत्रस्त झाला दिसे
नाहीं मी त्यजणार यास जगतीं हें श्रेष्ठ पुण्यस्थल
माझा देश मला अति प्रिय असे सिद्धांत हा प्रांजल

२

माझे पूर्वज जन्मले इह, तसे संवर्धले कीडले
स्वातंत्र्यीं रमले, सुवंद्य जगता झाले सुखी पावले
माझा जन्म इथें करूं मग कसा हा जन्म मी निष्फल
माझा देश मला अति प्रिय असे सिद्धांत हा प्रांजल

३

देशाला विकल स्थितींत बघुनि जे कोण दूरावती
स्वार्थाला बघती परांस भजती त्यांना मिळे दुर्गती
देशद्रोह करून मी मग कुठें टाकूं बरें पाऊल
माझा देश मला अति प्रिय असे सिद्धांत हा प्रांजल

४

माझा देश जरी अती तळमळे दासत्वतापीं महा
व्हावा तो महनीय धन्य जगतीं, ऐशी मदीया स्पृहा
यासाठीं तदियोदया करिन कीं उद्योग मी मंगल
माझा देश मला अति प्रिय असे सिद्धांत हा प्रांजल

---

## निष्काम कर्म

( शा. वि. )

१

कर्माचा अधिकार मात्र तुजला आहे जगीं या खरा
नाहीं कर्मफलास मात्र शिवण्या तें ग्राह्य आहे परा
यासाठीं फललोभ ठेवुनि मनीं कर्मे नको तूं करूं
तीं कर्तव्य म्हणून मात्र कर, कीं मागें नको तूं सरूं

---

# वीरोद्धार

-श्रीसंभाजीमहाराजांचें औरंगजेबाला उत्तर-

( लांकडी तरवार० )

मी आत्मयज्ञ करणार ॥ सुखें मरणार !
परि मृत्युभयानें मम वैऱ्याला शरण नाहिं येणार ॥ ध्रु० ॥

शार्दूल पंजरीं जैसा
तव हातीं पडलों तैसा
दैवाचा फिरला फांसा
जरि दास्याहत मी झालों तरिही शरण नाहिं येणार १

शत्रूस शरण जाण्याचा
हा धर्म नव्हे वीराचा
हा धर्म असे अबलेचा
महाराष्ट्रभूचा वीर पुत्र मी शरण काय येणार ! २

यावनी धर्म घे म्हणतां
तव सुता मला कां देतां ?
मग उगिच शीण कां घेतां
या धर्मोद्धारक हिंदुसुताला शब्द नाहिं खपणार ३

संग्राम जयाला प्रीय
तो छळास भिणार काय
मग वीरपुत्र ना होय
मम राष्ट्ररिपूला-धर्मरिपूला शरण नाहीं येणार ४

हीं आवडती जीवाची
तरवार याच हातींची
जर घेइल कोण शुराची
तर थरारेल ही महाराष्ट्रभू कोपेलहि अनिवार ५
मावळे मराठे वीर
घेउनियां भाले तीर
करतील शत्रुसंहार
महाराष्ट्रभूला स्वतंत्र करण्या अविरत ते लढणार ६

---

# उगवत्या सूर्यास प्रणाम

( पृथ्वी )

१

सहस्रकर ! तेजसा ! प्रभुवरा ! तमोध्वंसका !
प्रभातकुसुमोत्सवा ! हृदयचेतनोत्पादका !
प्रबोधचतुरा ! विशालबलधारका ! भास्करा !
प्रणाम करितों मदीय कर जोडुनी धीवरा !

२

तवोदय गिरीवरी बघुनियां उषा ही हंसे
तदा तरल रक्तता आभिनवा कपोलीं वसे
विनम्र गुणसुंदरी लसित अष्टदिग्देवता
प्रसन्न हृदयें अपूर्व सजती तुझ्या स्वागता

३

प्रभातसमयीं नवोनव अशा सुरम्याकृती
तुझे किरण-भृत्य हे गगनमंदिरीं काढिती

विशुद्ध रमणीयता सुरस थाटली पाहुनी
प्रसन्न अति हो तमश्रमित सृष्टि-देवी मनीं

४

सुरम्य कलिका लता-तरु कटीवरी बैसुनी
वनीं उपवनीं सुखें विहरती मधु स्यंदनीं
कुणी विकसुनी त्वदीय अभिदर्शनें हर्षती
कुणी हळुच आडुनी स्मितमुखें तुला पाहती

५

त्वदागमन पाहतां तरुशिखांवरी बैसुनी
तव स्तवन हे विहंग करिती मुदें गाउनी
तसे गगनिं मंडलाकृति फिरूनियां क्रीडती
महोत्सव सुसाजरा करिति चित्तहारी किती

६

तुला बघुनियां प्रफुल्ल मन जाहलें भास्करा !
मदीय हृदयीं प्रमोद भरला कृपासागरा !
घडो सतत हें तुझें मजसि दिव्यसें दर्शन
करी मलिनसें हृदंतर विचार जें पावन

# स्वदेशी-सत्कार

( मंदाक्रांता )

१

राष्ट्रश्रीची अभिनव अशी उन्नती व्हावयास
स्वातंत्र्याच्या प्रखर कलहीं येशसंपादनास
रक्ताचे जे असताल खरें पुत्र या आर्य-भूचे
व्याक्ति-स्वार्थ त्यजुनि बघती स्वार्थ देशोन्नतीचा

२

स्वार्थापायीं अधिगुण अधिष्ठान राज्यें लयाला
गेली त्यांचा अनुभव इतीहास सांगे तुम्हाला
व्हावी लोकीं सुसुखि जर ही आमुची आर्यभूमी
ठेवा वस्तु निजजनपदीं निर्मिल्या त्या स्व-धामीं

३

शृंगारा हें शरिर अपुलें घेउनि देशवस्त्रें
स्वातंत्र्याला निकट करिती हींच कीं दिव्यशस्त्रें
आहाराला विविध परिचें अन्न घ्या हो स्वदेशी
धिक्कारा ही विषसम अशीं खाद्यपेयें विदेशी

४

व्यापाऱ्यांनीं विविध जिनसा आणुनी दूरदर्शी
नेलें सारें धुउनी अमुचें राष्ट्रवित्त स्वदेशीं
बाबांनों ! हे बघुनि नयनीं अंधता कां धरीता
स्वैराचारें पराकि बनुनि जन्मभू कां वधीता !

# माझा देश

( साधें गीत )

१

माझा माझा देश म्हणोनी
कितीक गेले वीर मरोनी
अभिन्न तत्वा स्वीकारोनी
जगीं वागलें सांगा कोणी ?

४

माझा माझा देश म्हणोनी
अंधभक्तिची मशाल घेउनि
वेड्यावाणी फीरफिरुनि
कुणा मिळाली स्वराज्य धरणी ?

३

समुद्रलहरी विभिन्न दिसती
एकरूपता त्यांची असती
पाण्यावर जे बुदबुद येती
क्षणांत जलांत विरुनी जाती

४

माझा माझा देश कुणाचा
एकरूपता आहे त्याचा
शब्दीं नाहीं देश कुणाचा
वाऱ्यावरती खुशाल नाचा

५

मातृभूमिचे सत्पुत्र भले
मांडी घालुनि जागीं बसले
अर्ध्या हळकुंडाचे पिवळे
भीतीच्या उदरांत दडाले

६

पुष्पावरचीं फूलपांखरें
होउनि नाचा खुशाल सारे
लुकलुक करिती नभिंचे तारे
तेज जयांचें अल्पच सारें

७

उठला सुटला पुढती येतो
देशाचा कैवारी म्हणतो
प्रसंग येतां दूरी पळतो
भूमातेचा सेवक का तो ?

८

नाहीं भीती ज्याच्या जीवा
त्यानें माझा देश म्हणावा !
धैर्याशीं परि ज्याचा दावा
त्यानें माझा देश म्हणावा ?

९

गेला माझा देश म्हणोनी
प्रतापराणा-वीर-शिरोमणी

बापु गोखले अष्टीचे रणिं
आत्मयज्ञ तो गेला करुनी

१०

शिवप्रभूचे वीर मावळे
देशासाठीं समरीं लढले
दासत्वाचे पाश तोडूनी
स्वतंत्र केला महाराष्ट्र झणिं

११

पुण्यपुरीचा बाळ बहुगुणी
हाल अपेष्टा अती साहुनी
माझा माझा देश म्हणोनी
अखेर केली या शब्दांनीं

१२

देशासाठीं झिजे निशिदिनीं
तयास माझा देश म्हणोनी
मिरवायाचा अधिकार जनीं
आहे, घ्यावें हें समजोनी

# शुक्लेंदु-कला

( पद )

१

नयनरम्य इंदुकला गगनिं उगवली
मधुर हास्य नवतीचें
प्रेम सुधागोडीचें
गालिं दिसे वारुणिचे
गगनमंडळीं !

२

सर्वांगा शुद्ध जलें
कल्प तरूचीं विमलें
तारका सुरम्य फुलें
भवतिं विकसलीं

३

स्वर्गाचें तोंड खुलें
होउनिया नभ उजळे
दिव्यदीप्ति त्यांत खुले
पश्चिमाचलीं

४

भाविकालसौख्याची
तेजोमय शांतीची
नवजीवन सत्वाची
आस निपजली

५

दुःसहशा परवशतीं
जगतावरि जे असती
धरी देह तच्चित्तीं
कला चिमुकली

६

पश्चिमतम सागरांत
दिव्य तेज होय लुप्त
तेंच काय हें झळकत
गगनमंडलीं !

७

ऋषियोगी पुण्यवंत
सूक्तें अभिजात गात
या समयाला उतरत
काय भूतलीं !

८

समरधीर भाग्यवंत
घेउनि खड्ग निज करांत
चमकावित वीर येत
काय भूतलीं !

९

धर्मवीर साधुसंत
ज्ञानसुधा वर्षावित

या कालीं हंसत येत
काय भूतलीं !

१०

उठा उठा ! स्वागतास
सामोरे जाउं त्यांस
दास्यमुक्त करायास
हिंदमाउली !

---

## सांग मजला

पयोदांवांचूनी जल कुठुनिया येइ भुवनीं
जलाभावीं पद्में उगवति तळ्यामाजि कुठुनी
जिथें नाहीं पुष्पें परिमल कसा तेथ मग तीं
अशा स्थानीं कैशा भ्रमरतति मोदांत फिरती १
जिथें या स्वार्थाची प्रबल मनिषा संतत वसे
तिथें सद्धर्माची मधुतर सुधा काय गवसे
नसे शद्वांमाजी हृदयिं करुणा प्रेम ममता
तिथें न्यायस्थानीं कुठुनि अढळे न्यायसमता २
नसे या भूपृष्ठावरि पवन हा शीतल असा
जगायाला श्वासक्रम नियत चाले मग कसा
जिथें देहीं नाहीं विलसत खरी जीवनकला
तिथें सौंदर्याची द्युति कशि दिसे ? सांग मजला ३

# बालवीर

**कथाप्रसंग:**—बोरघाटाचे लढाईंत इंग्रज आटपेनासे झाल्याची बातमी पुरंदरावर पोंचली. त्या वेळीं नाना फडणवीस, सखारामबापू वगैरे मंडळी खिन्न होऊन श्रीमंत सवाई माधवराव जेथें निजले होते, तेथें पलंगाजवळ बसली होती. सवाई माधवराव जागे होऊन पाहातात तों सर्वजण म्लानवदन दिसत आहेत. नंतर असें होण्याचें कारण काय म्हणून श्रीमंतांनीं विचारलें. ' इंग्रज आटपत नाहींत म्हणून आम्ही दिलगिर आहों ' असें बापूंनीं सांगितलें; तेव्हां ' काय इंग्रज आटपत नाहींत ? ' असें विचारून त्या बालराजानें आपली तरवार मागविली व पलंगावर उभें राहून तीन वेळ गर गर गर अशी फिरवून उत्तर दिलें कीं ' इंग्रज ठार झाला. ' इतक्यांत घाटांतून फत्ते झाल्याची डाक आली कीं, ' खासा इस्टुर फांकडा ठार झाला व इंग्रज फौजेसुद्धां घाट उतरून पळत गेले. ' या आख्याइकेंत व प्रस्तुत कवितेंत थोडीफार भिन्नता दिसून आल्यास रसिक वाचक क्षमा करतील काय ?

( मंदाक्रांता )

१

नाना, बापु, त्वदिय वदनें कां अशीं म्लान झालीं
विघ्नें ऐशीं निकट तुमच्या कोणतीं घोर आलीं ?
ज्ञानासीनें अजवरि महा नाशिल्या विघ्न-पंक्ती
“ धीर—ज्ञांते कठिण समयीं धैर्यपंगू न होती ! ”

२

बापू बोले, भटकुलनृपैश्वर्य हे बालराजा !
साम्राज्याची धरुनि मनिषा त्वत्पितावैरि आजा
झाला साह्य त्वदिय रिपुला घेउनी सैन्यशक्ती
" स्वार्थापायीं त्यजुनि सुमती साधुही दुष्ट होती ! "

३

ज्यांना वाटे मनिं विषमता पाहुनी राष्ट्र-सत्ता
ज्यांच्या नेत्रीं सलत असती प्रत्यहीं भव्यमत्ता
राजा ! त्यांना कलहि अमुच्या हात घालावयाला
नायासानें अनुरुप असा पर्वणीकाल आला

४

संग्रामाला जलचर मुदें वीर उद्युक्त झाले
राघोबाला स्वकरिं धरुनी घाट चालोनि आले
शासायाला समरविजयी वीर गेले स-सैन्य
" राष्ट्रासाठीं स्वशिर समरीं अर्पिती तेच धन्य "

५

घाटामाजीं उभय चमुंचें माजलें युद्ध घोर
धारातीर्थीं तरुण अमुचे हाय ! गेले अपार
राजा ! युद्धीं परि निजदला नाटपे शत्रु-सैन्य
तेणें आलें वदनिं अमुच्या संप्रती भीति-दैन्य

६

' आणा माझी असि चिमकुली ' बोलला भूप बाल
क्रोधावेशें तनु सकलही तत्क्षणीं झालि लाल

बाहूंमध्यें स्फुरण चढुनी होत कंपायमान
शय्यास्थानीं रण समजुनी ठाकला धैर्यवान

७

' मद्राज्याची धरुनि मनिषा पातला वैरि कोण !
त्याच्या वक्षःस्थलि निजपदा देउनीया चिरीन '
खड्गालागीं गर गर असें फीरवूनी त्रिवार
बोले राजा, ' मदिय रिपु हो बोरघाटांत ठार. '

८

आली वार्ता तवर समरांतूनि ही तोषदाई
' श्रीमंतांना जय मिळुनियां शत्रु माघार जाई '
या वार्तेनें सकल हृदयीं हर्षतारा उदेला
केव्हां केव्हां सहज वचनें येति तीं प्रत्ययाला

---

## मराठा वीर

( लांकडी तरवार० )

१

हा मानि मराठा वीर ॥ खरा रणधीर
श्रीराष्ट्रदेविचा स्वतंत्रतेचा केवळ मूलाधार ॥धृ० ॥
हा महाराष्ट्र मद्देश
अभिमानें करि जो घोष
ना मना भीतिचा लेश
कर्तव्यच्युत तो कधीं न होई धीरवीर गंभीर

२

स्वातंत्र्य जीव मानोनी
हा वीर मराठा मानी
तरवार करीं घेवोनी
स्वातंत्र्यसंगरीं स्वदेशार्थ हा उडी घेई निर्धार

३

अरिसर्प जयाच्या पुढती
थरथरां कांपती चित्तीं
निजजांवा भिउनी पळती
गडि अतुल निश्चयी वीर मराठा राष्ट्राचा आधार

४

जरि मरण दिसे डोळ्यांला
निज तनू दुष्ट काळाला
स्वदेशार्थ अर्पायाला
रणिं हास्यमुखानें उभा राहि हा प्रफुल्ल जणुं मंदार

५

दुर्धरही रिपुच्या पुढतीं
ना मान वांकवी कधिं ती
उभा राहि ठोकुनि छाती
हा वीर मराठा लढतां शत्रू रणीं घेइ माघार

६

उत्तुंग कडे अचलांचे
लंघुनी सहज खडकांचे
थयथयां तयांवर नाचे
महाराष्ट्रभूचा सुत तेजस्वी श्रेष्ठ मराठा वीर

# महाराष्ट्रावलोकन

( साधें गीत )

१

उभा राहुनी पर्वतशिखरीं
दृष्टि फेंकिली दूर तुजवरी
वस्तुमात्र मृत दिसती मजपरि
स्वातंत्र्य-श्रीवैभव जाउनी पारतंत्र्य हें तुज आलें
विक्रमशाली धीरोदात्ता
बघुनी तुजला हतबल आतां
विविध कल्पना लहरी उठुनी हृदयाब्धी हा मम हाले

२

कालरूपिणी अष्टींची स्मृति
नाचुं लागली द्रुतगति चित्तीं
क्षणांत आली मजला भ्रांती
संभ्रमिं पडलों हाय बुडालों सुविचारी मन गोंधळलें
सह्यगिरीच्या वातावरणीं
खालीं बसलों पिसा होउनी
नयनांतुनि बहु अखंड खालीं दुःखाश्रू घळघळ आले

३

स्फूर्तिजन्य मधु शीतल वातें
नितांत मंजुळ गाउनि गीतें
स्मृतिज्ञान हें दिधलें मातें
दृष्टि फेंकिली पुन्हा चहुंकडे प्रदग्धमानस जरि झालें

सान्राज्याचे तंव अवशेष
पाहुनि माळावरती ओस
वेगनिर्भरें पुनश्च माझ्या चित्तीं भडभडुनी आलें

४

अशा स्थितींतहि गिरि-उदरांतुनि
नित्यानंदी निर्झर गाणीं
पुनश्च पडलीं मदीय कर्णी
जीवकला मम जीवा येउनि आशोत्कट हें मन झालें
त्या गीतांनीं तल्लिन झालों
स्वैर गतीनें गाउं लागलों
कडव्या मागुनि कडवीं गातांगातां भानहि मज नुरलें

५

जनक असूनी तूं वीरांचा
बंद पदीं परि अजि दास्याचा
पडुनी, लय हो स्वातंत्र्याचा
मानधन महाराष्ट्रा तुझ्या अदृष्टीं का हें लिहिलें ?
होतीं राज्यें विक्रमशाली
रसातळाला परंतु गेलीं
विषाद वाटे एवढाच कीं कलहचिंतनीं जन रमले

६

प्रेमरसानें हेलावोनी
गंभिर गर्जित गाउनि गाणीं
पश्चिम सागर तुजला न्हाणी

दुःख निवारुनि शांत कराया सेवाधर्मा आचरिलें
मुक्तारत्नें पहा बहुपरीं
अर्पी त्वदीय भांडागारीं
परि दारिद्र्यामाजी पडुनी दिवस कंठिसी हे असले

७

शैलावरच्या दुर्गश्रेणी
साम्राज्याचीं तव जीं ठाणीं
भेसुर दिसती प्राण जाउनी
प्रणाम कुठला करणें आतां दोन्ही कर गळुनी पडले
छत्रपतींचा राज्यपसारा
कालोदरांत दडुनी सारा
सत्ताबंधन संप्रति पडुनी घोर रूप हें तुज आलें

८

निसर्ग-सुंदर या तरुवेली
मृदुल फुलांची भरुनि अंजली
सदा वाहती प्रभातकाळीं
नवलपरीच्या पल्लव शाखा चवऱ्या ढाळिति कुतूहलें
स्वागत करिती फुलें बिचारीं
सुखवायाला झटति भारी
प्रेतरूप परि तुजला पाहुनि दुःखानें मिटती डोळे

९

पुण्यमयी या विशाल-सरिता
शांतपणानें वाहुनि जातां
जीवन देती तुझिया प्रांता

सांप्रत तूझी काय दशा ही
स्मशानभूमी दिसते पाहीं
दुर्भिक्षाचा काळ सदोदित तुजवरती फिरवी डोळे !

१

देशासाठीं समरीं लढले
निज हाडांचे करूनी भाले
रसातळाला रिपु पोंचविले
धन्यवीर ते धन्य मातृकाराष्ट्रश्रीला सुयश दिलें !
तिथेंच आतां किती भिकारी
पोटासाठीं दारोदारीं
आक्रोशन अति करुनी फिरती त्राण जयांना मुळि नुरलें !

१

सम्राटांच्या भव्य मंदिरीं
विजयलक्ष्मी वास नित करी
हय-गज पंक्ती डुलती दारीं
स्वराज्यदर्शक भगवा झेंडा लीलेनें गगनीं खेळे !
त्या विभवाचा लय होवोनी
भुतें नाचती त्याच ठिकाणीं
आशा भरुनी उंच ढिगारे जिकडे तिकडे हे पडले !

# रानफुलास

( गीत )

१

निसर्गसुंदर हिरव्या रानीं
अव्याजमनें डोल डोलुनी
नाचत होतें प्रफुल्ल फूल
वनदेवीच्या शीर्षावरिल
त्या रानाचें ॥ लेणें साचें
पाहुनि झालों सतेज काया
जवळी गेलों मी भेटाया

२

निसर्गनिर्मित फूलवेलींचा
ललितपाळणा झोंपायाचा
मारुत हलवी झोंके देउनि
निर्झर गाती प्रेमळ गाणीं
खालीं वरती ॥ पानें हलती
दंव बिंदूचे मौक्तिक सुमणी
खेळायाला असति खेळणीं

३

जगतावरच्या उच्चस्थानीं
बसले निश्चल ठाण मांडुनी

किल्ल्यांवरचे वीर सुभागी
पर्णकुटींतिल ते ऋषियोगी
तुझे सोबती ॥ सगळे असती
महाभाग तूं त्यांच्या चरणीं
तुजविण नाहीं दुसरें कोणी

४

कृत्रिम बागा असति भूवरीं
सुंदर पुष्पें असति किती तरि
बंदिवास परि वर्षावर्षें
त्यांत तयांना कसला हर्ष ?
रक्षकसदनीं ।। उभे राहुनी
ताडण करिती कटु शब्दांनीं
अशा स्थलातें जावें कोणी ?

५

तुझी बागही किती मनोहर
स्वातंत्र्याची खनी खरोखर
ते पशुपक्षी दिवस कंठिती
हे पशुपक्षी हंसति खेळती
ते किती रडती ॥ हे किति गाती
येथिल महिमा सर्व निराळा
त्या स्थानाचा मांड वेगळा

६

निर्मल आहे ज्यांचें पाणी
रम्य तळीं हीं स्फटिकावाणी
ओंगळ डबकीं तीं कोणिकडे
लवलव करिती त्यांत बहुकिडे
कशास कांहीं ॥ मेळच नाहीं
या निसर्गकृतिचीं सरी अशी
कृत्रिमतेला येईल कशी ?

७

रसिक फूला ! प्रेम निर्भरा
निसर्गनिर्मित या माहेरा
सोडुं नको तूं किति भुलावणी
साखरचुंबळ देउनि कोणी
ही पुण्याची ॥ भूमी साची
कृत्रिमतेचीं भव्य मंदिरें
असती अल्पायूषी तीं रे !



# कोण कुणाचें जगिं नाहीं

(गीत)

१

दैन्यकाल जेव्हां येई
कोण कुणाचें जगिं नाहीं ॥ ध्रु० ॥
नभःपथीं रवि येऊन
चंद्र होय जेव्हां दीन
विसरुनियां सारी प्रीती
चंद्राला सोडुनि जाती
तमानाइका
सखीचंद्रिका
सुतातारका
हाच सदा अनुभव येई
कोण कुणाचें जगिं नाहीं

२

तारा तुटतां नभांतरीं
सांवरून त्या कोण धरी ?
बंधु मित्र नभीं हांसती
तारा पारि पडे खालती
जगिं वत्सलता
एकच असतां
अशी भिन्नता
दिसून येते कां हृदयीं
कोण कुणाचें जगिं नाहीं

३

विशाल तरु धरणीवरता
उन्मळून पडला असतां
तरू-निवासी पक्षिगण
मायाबंधन तोडून
एक भरारी
घेउन भारी
जाती दूरी
क्षणिक सोबती हे पाही
कोण कुणाचें जगिं नाहीं

४

सुगंधयुत हंसरें फूल
पाहुनियां भ्रमर विलोल
पुष्पसार सेवायाला
हर्षानें चुंबी त्याला
पुष्प बहुगुणी
मलुल पाहुनी
त्यास सोडुनी
झंकारत निघुनी जाई
कोण कुणाचें जगिं नाहीं

५

जोंवरि चाले श्रीमंती
लोक तोंवरीं गृहिं जमती

दैन्यकाल परंतु येतां
तेच लोक ढकलिति परता
निज देवाचा
दुसरा कैंचा
आपण साचा
व्यवहारीं अनुभव येई
कोण कुणाचें जगिं नाहीं

---

## पुष्प-स्वागत

(वसंत वाता बहार०)

१

राजस पुष्पा ! स्वातंत्र्याच्या सुखशैलीं पाहुनी
विकसलें तोष-कमल मन्मनीं
सुंदर लतिका पल्लवयुक्ता निज शाखीं बसवुनी
डोलवी आंदोलन देउनी
मरंदलोलुप भृंग-संघ हा भंवताली नाचुनी
खेळवी हर्षे तुजलागुनी
निर्झर-गायक-समूह सुस्वर गीतें तुज गाउनी
रंजवी मोदभरें निशिदिनीं
गगनविहारी विहंगमेळा तुजजवळी बैसुनी
ऐकवी विश्वकथा बोलुनी
नंदनवनसम सुरम्य विपिनीं जन्म तुझा होउनी
सुरपातिश्रीसुख लाधे जनीं

२

तव तनुवरती तरल रंगरस मनोहारि फांकले
पाहुनी वनसुंदरि ही डुले
कोमल–हृदयी सुंदर कलिका जोडुनि कर आपुले
स्वागता सजल्या प्रेमामुळें
अरुणकिरण हे मृदुता धरिती पाहुनि तुज विकसलें
उषा ही उधळी मुक्ताफळें
हास्यविनोदी गगननिवासी रम्य तारका–फुलें
लाजती तुझिया उदयामुळें
धवल ज्योत्स्नातेजें शोभवि भूनभ हीं मंडलें
चंद्र तो पाहुनि तुजला मळे
दाहि दिशांचे दरवाजे हे होती गगनीं खुले
बघाया रम्य विभव येथलें
तवगुणपरिमल वायु दिगंतारिं पसरी प्रेमामुळें
म्हणुनि तव नांव जगीं जाहलें

३

गुणगंभीरा ! प्रेमनिर्भरा ! राजविलासी फुला !
सांगतों जन्मसफलता तुला
दृश्य वस्तु या नश्वर साऱ्या नियम असे हा खरा
विचारें शोधुनि पाहीं जरा
परब्रह्मपदलाभ जयांनीं केला ते शाश्वत
जगीं या झाले कीं निश्चित
अमोल काया कर अर्पण ही प्रभुच्या चरणांवरी
धन्य हो नश्वर या भूवरी

---

# झाला हा पुरुषार्थ काय ?

सुनीत

( शा. वि. )

ज्यानें ना निजजन्मभू-शिव कधीं चित्तामधें इच्छिलें
स्वेच्छेनें परदास होउनि तसें स्वातंत्र्य उच्छेदिलें
स्वार्थाला भुलुनी स्वकीय जनता शत्रूपरी मानिली
धर्माची अवहेलना करुनियां दुष्कीर्ति संवर्धिली
अन्योत्कर्ष हृदंतरीं सहन ज्या झाला न पाहूनियां
दुःखीं जे कढती अनाथ बघुनी आली न चित्ता दया
सत्कार्य प्रिय मानिलें न, कुमती लोकांस संपादिलें
देवाला नयनीतिला विसरुनी पापास आलिंगिलें
लोकांना छळिलें अकारण जयें स्वीकारुनी क्रूरता
सांगोनी जन-चाहड्या मिळविली भूपालयीं मान्यता
कापट्यें जनघातपातकरणीं केलीं महा भीषणा
भक्ष्याभक्ष्य विचार हा न शिवला खातां जयाच्या मना
विद्येची पदवी अशास जरि ती भारी विशाला असे
झाला हा पुरुषार्थ काय ? कविचा हा प्रश्न त्यातें असे.

---

# चंडोलास

(शा० वि०)

१

चंडोला ! प्रिय वाटतें न मजला हें बा तुझें गायन
माझें चित्त हताश नाथविरहें झालें असे पोळुन
आनंदें सुखसंविहार करण्या आहेस तूं मोकळा
दुःखाच्या दृढ तंतुनीं जखडिला आहे परी हा गळा

२

चंडोला उडुनी असा जवळ ये, बोलावया बैस रे !
हे तापप्रद घालवूं दिन कसे हें सांग मातें बरें
नाथानें मज टाकुनी भुवनिं या स्वर्गास जा आपण
कांतेची विमनस्कता न दिसली कैशी तयाला पण !

३

जातांना वदला, " प्रिये, करुं नको तूं शोक माझ्यास्तव
सद्भावें परमादरेंच कर या विश्वंभराचा स्तव
प्रेमाचा अनुबंध आज तुटला जो जोडिला या करें
आतां सांगत नाहिं मी अधिकसें कांहींच येतों बरें ! "

४

चंडोला ! मनिं जाणिलें न पतिची होणें कधीं भेट हें
आशा वाढविती परंतु मदिया " येतों बरें " शब्द हे
वाऱ्यानें तरुंचीं जरी सळसळा पानें कुठें वाजलीं
जातें मी तिकडे अती लगबगा कोणी नसे त्या स्थलीं

५

या शय्येवरि नाथमूर्ति दिसली स्वप्नांत माझ्या दिसे
वारंवार उठोनि मात्र बघतां कोणी कुठेंही नसे
भीतीनें मम जीव घाबरुनि हा रोमांचही ऊठती
मूर्च्छा येउनि मी पुन्हा पडतसें, ही नित्य माझी स्थिती

६

स्वर्गी जाउन एकमास घडला अद्याप येणें नसे
याचा नित्य विचार चित्तिं करितें हें काय झालें असें
स्वर्गद्वार सदा असे तुज खुलें गंधर्व तूं तेथला
यासाठीं सखया विनंति करितें मी एक आतां तुला

७

माझें ठाउक होय दुःख तुजला नाथास सांगावया
सर्वस्वीं मज दुःखमुक्त करणें आहे तुझ्या हातिं या
माझ्या दीन विनंतिचा करुं नको अव्हेर रागाउनी
वार्ता घेउनि ये मदीय पतिची स्वर्गावरी जाउनी

८

जा ! जा ! जा ! सखया जिवास कर या दुःखांतुनी मोकळा
हा आहे बघ दूरवासि पतिच्या वार्तेवरी टांगिला
माझा देह जरी असे पहुडला या दुःखशय्येवरी
यारीं चित्त नसे विचारलहरी येऊन नानापरी

९

चंडोला ! परि गायनांत रमुनी तेथेंच राहाशिल
ऐसें मात्र नको मुळीं करुं बरें मत्प्राण हा जाइल

आपत्तींत अशा भयंकर महा मी त्रस्त झालें खरी
ये हो बा ! लवलाहि घेउन इथें वार्ता पतीची तरी

---

## छंद असावा

(भाव धरारे०)

छंद असावा ॥ परिणामीं हितकर व्हावा ॥ धृ० ॥

छंद असावा देवभक्तिचा
छंद असावा देशभक्तिचा
छंद असावा सत्कार्यांचा ॥ छंद० ॥ १ ॥

छंद असावा सद्ग्रंथांचा
छंद असावा सत्काव्याचा
छंद असावा सत्संगाचा ॥ छंद० ॥ २ ॥

छंद असावा चित्रकलेचा
छंद असावा शिल्पकलेचा
छंद असावा कृषिशास्त्राचा ॥ छंद० ॥ ३ ॥

छंद असावा योगपथाचा
छंद असावा निजधर्माचा
छंद असावा पुरुषार्थाचा ॥ छंद० ॥ ४ ॥

---

[library stamp]

# दास्य-धर्म

( नीज गुणी बाळ० )

१

दास्यधर्म देइ कठिण यातना मना
नृकराविण अनुभव हा येइना कुणा
स्वामिपाशिं कर जोडुनि उभें राहणें
मनोधर्म जाणुनियां त्याशिं बोलणें
भीतिकळा वदनावरि तैशि आणणें
सत्य बोल बोलण्यास चोरि आनना !

२

'अश्वशृंग,' धनि म्हणतां मान हलविणें
सागरास मधु म्हणतां होय बोलणें
रवि शीतल म्हणतां, बहु थंड सांगणें
दिवस घालविणें करुनि हांजिजीपणा

३

पदोपदीं मानभंग होइ हा खरें
कठोर शब्द हृदयाला पाडिती घरे
त्यायोगें शांतिसौख्य हृदयिंचें चुरे
मृत्यु बरा याहूनी वाटतें मना

४

श्वानाला कांहिं मान दारच्या असे
भिकाऱ्यास मधुशब्दें कुणितरी पुसे

हीन जाति मानपदीं कधिं कधीं दिसे
परी सेवकास जगीं मुळीं मान ना

५

मधुवाणी असतांना मुका भूतलीं
करपद हे असतांना वृत्ति पांगळी
नयन तेजदार असुनि दृष्टि आंधळी
प्राणरहित बाहुलि जणुं जीव हा जनां

---

## वीर पंचहत्यारी

( गीत )

१

बंदुक भाला करिं तरवार
ढाल पाठिशीं कमठा तीर
अभिनव अश्वावरचा स्वार
भारि भरारी ॥ तीर अंबरीं
करी अरिवरी स्वारी ॥ ' वीर पंचहत्यारी '

२

समरगर्जना या वीराची
धूळ उफाळे हयटापांची
आकाशींच्या ग्रहगोलांची
त्या योगानें ॥ छाति दणाणे
दावी कर्तबगारी ॥ ' वीर पंचहत्यारी '

३

विशाल छातीचा हा वीर

खल काळाचें कापुन शीर

गांठा सत्वर यशोमंदिर

शील शोभवी राष्ट्र भूषवी

अढळ निश्चयी भारी ' वीर पंचहत्यारी '

४

स्वदेश आणि स्वतंत्रताही

रणांगणावर दोनच पाही

अन्य हेतु त्या ठाउक नाहीं

घोर संगरीं करी अरिवरी

शस्त्रांची मारगिरी ' वीर पंचहत्यारी '

५

स्वतंत्रतेचा प्राणचि मूर्त

राष्ट्रदेविचा सात्विक भक्त

धर्मपरायण चित्कलायुत

रिपुचा मद हा हरी ' वीर पंचहत्यारी '

# बुद्धिः अन्नानुसारिणी

( शा० वि. )

१

होता एक महातपोधन यती गंगातिरीं काननीं
तत्पुण्यें महनीयता विलसली होती तिथें सद्गुणी
वाटे स्वर्ग तिथें दुजा प्रकटला आनंदचिन्मंगल
कीं जो मुक्त करील मृत्यु भुवनीं लोकां भवाब्धींतिल

२

त्या स्थानीं रमणीय वृक्ष लतिका होत्या किती डोलत
तैसा शीतल मंदगंध भरुनी वायू सदा वाहत
चाले तेथ विहंगगायन मुदें जें चित्त संतोषवी
होते निर्झर, सृष्टि सिद्धि तिथली सांगू किती थोरवी

३

सेवी कंदफळें कधींच दुसरें त्या अन्न ना ठाउक
आहारें घडली पवित्र यतिची बुद्धी खरी सात्त्विक
त्या ठायीं तशि शांतता विमलता होती तदिच्छेपरी
ऐसे सत्त्वनिधानसुस्थल कुणा पाप्यास ना उद्धरी

४

त्या स्थानीं यतिदर्शनास नियमें जाती सभावें जन
झालों बोलति भाग्यवान् करुनियां प्रेमें तया वंदन
कोणी दुष्ट परी विकल्प धरुनी चित्तांत जाई जरी
पाहोनी स्थल तें मनीं विरघळे लीनत्व पावे तरी

५

पाहावीं भुवनप्रसिद्ध फिरुनी पुण्यस्थलें आपुलीं
एके काळिं सुसत्त्वशील यतिला इच्छा अशी जाहली
या साठीं यतिनें निजाश्रम महासत्त्वस्थसा सोडिला
एका मागुन एक एक समुदें तीर्थे फिरूं लागला.

६

ऐसा हा क्रम चाललाच असतां एका विशालीं पुरीं
आला तो यति सत्वशील सहजीं एका कुसीदाघरीं
त्यानें त्या परमाग्रहें निजगृहीं ठेवूनियां घेतलें
पक्वान्नें मधु घालुनी सुवसनें देऊन सत्कारिलें

७

ना होती कुसिदास ठाउक मुळीं ध्यानीं मनीं न्यायता
चौर्यानें धनकोश सर्व भरला होता बरें तत्वतां
ऐशा त्या सदनामधें वसुनियां सेवी यती अन्न तें
कीं जें सन्मति मोहवूनि कुपथा लावील ती निश्चयें

८

ऐशा या स्थितिमाजि चार दिन ते गेले यतीचे महा
अन्नाचा गुणधर्म तोचि जडला त्याच्याहि चित्ता पहा
त्याची बुद्धि चळून एक दिवशीं संशुद्ध, सद्बोधक
चोरीची मनिं वासना उपजली जी वाटते मोहक

९

संधि साधुनि 'रत्नहार, यतीनें' एके दिनीं चोरिला
द्वारीं रक्षकदृष्टितें चुकवुनी मार्गस्थ तो जाहला

गेला वेगभरें पुढें वनकुटीं तो बुद्धिसत्त्वच्युत
कीं ज्या हातुनि पापकर्म घडलें होतें महा निश्चित

१०

आमूलाग्र नितांत शांत विमल प्रांतांत गेल्यावरी
झाले जागृत सद्विचार यतिचे ते पूर्विचे अंतरीं
माझे हातुन चौर्य-पाप घडलें तेव्हां तयाला कळे
तो झाला विमनस्क फार हृदयीं पस्तावुनी यामुळें

११

धावा नेउन 'रत्नहार, यतिला इच्छा अशी जाहली
गेला याःतव सावकारसदनीं तो धाइच्या पाउलीं
हातांनीं निज 'रत्नहार' यतिनें त्याच्यापुढें ठेविला
साष्टांग प्रणिपात त्यास करुनी बोलूं यती लागला

१२

हे श्रीमान्! अपराध घोर घडला बुद्धिभ्रमें मत्करीं
पस्तावा मज होउनी स्वकृतिचा आलों इथें हा परी
आहे विज्ञप्ति आपणाकडुन कीं व्हावी क्षमाही मला
रक्षा यास हृदंतरीं धरुनियां प्रीती दया उज्वला

१३

बोले हांसुनि सावकार यतिला चित्तीं नका घाबरूं
आहां भूमितलावरी तुम्हि खरे सत्वस्थसे सद्गुरु
झाले दर्शन आपुलें मज इथें मद्भाग्य हें निश्चित
मत्पापक्षय जाहला समजतों कीं जन्म-जन्मार्जित

१४

सत्वश्रेष्ठ यते! परी उपजली दुर्बुद्धि चित्तीं कशी
याचें राहुनि राहुनी प्रतिपळीं आश्चर्य वाटे मशीं
केले तर्क विचार पुष्कळ परी मद्‌बुद्धिला ना कळे
याचें कारण शोधुनी तर पहा, हृद्‌ज्ञान तेजोबळें

१५

माझे हातुन चौर्यकर्म घडलें स्वप्नींहि जें पूर्वी ना
तेव्हांपासुनियां मदीय हृदया जो देइ संवेदना
तो हा प्रश्न विचारिलास मजला सध्हेतुनें निश्चयें
त्याचें उत्तर शोधिलें निजमनीं तें एक एकाग्रतें

१६

हे श्रीमान्! धन जें तुवां मिळविलें लोकांचियापासुन
तें सारें अविचारमूलक अशा चोऱ्या करूनी पण
अर्थात् हे कुलिदा! त्वदीय गृहिंचें तें अन्न पापी अती
कीं जें दुष्परिणाम मात्र घडवी मोहूनियां सन्मती

१७

अन्नाचा गुणधर्म या उतरला मच्चित्तभूमीतरीं
तेणें मन्मन–सद्विचार सुटुनी तें होय वेड्यापरी
माझे हातुनि चौर्यपाप घडलें अन्नामुळें स्थानिं या
"आहारापरि बुद्धि ही घडतसे" हें येइ मत्प्रत्यया

---

# एका विद्यार्थ्याचे आत्म-विचार

(अर्थ तनू वारुळीं)

परीक्षेंत मज अपयश आलें काळजींत मन कढे
सुचेना काय करावें पुढें
रात-दिवस मी प्रयत्न केले अभ्यासीं किति तरी
विफल ते आज जाहले परी ॥
प्रश्नांचा जन करतिल मारा बहुविध माझेवरी ॥
उत्तरें देउं काय मी तरी ॥
अवकृपा गुरूंची होईल आतां खरी ॥
हे मित्र टवाळी करतिल नानापरी ॥
बाबाहि बोलतील कटु वचनें किति तरी ॥
वाक्शल्यें तीं साहुं कशीं तरि चिंता मजला जडे ॥
सुचेना काय करावें पुढें ॥

२

जीवित माझें भयाण दिसतें मजला भूमीवरी ॥
सुखाशा दिसे न मुळिं अंतरीं ॥
मीच एकला हतभागी या अनंत विश्वोदरीं ॥
मृत्युची इच्छा जो या करी ॥
हताश मनुजा कशास जगणें मरणें योग्य तया ॥
मृत्यु हा करील का पण दया ॥
ही बुडवावी तनु मोठ्या सागरजलीं ॥
कीं ढकलावी वरुनिया गिरीच्या तळीं ॥

का विष प्राशुनी तनुचा द्यावा बळी
आत्म्याची ही हत्त्या होउनि पातक परि मज घडे
सुचेना काय करावें पुढें

३

बारा वाटा मला मोकळ्या जावें देशांतरा
नको हा व्यर्थ जिवाचा चुरा
अथवा जावें जगत्प्रभूच्या भक्तीला काननीं
तिथें ना येती जन हे कुणी
गुहाश्रयीं वा वास करावा एकाद्या पर्वतीं
तिथें ही निश्चल होइल मती
परि मिळेल तेथें अन्न कसें खायला
तो थंडी वारा साहवेल का मला
मी राहुं कसा त्या स्थलीं किर्र एकला
याहि विचारें धीर लोपुनी मदिय जीव धडपडे
सुचेना काय करावें पुढें

४

मत्सम हताश जे विद्यार्थी विचार करिती मनीं
तयांना काय दिसे या जनीं
कर्तृत्वहीनता तयां न रुचली सदुद्यमप्रीयता
तयांना रुचलीही तत्त्वतां
स्वोत्कर्षाचा हृदयशांतिचा मार्ग सदुद्यम खरा
याविण दिसे न जगिं दूसरा

पुरुषाला पौरुष शोभा देई जनीं
सत्श्रेय न पदरी जीव उगिच मारुनी
वा हिंडुनि दुबळ्या चित्तें रानीं वनीं
दृष्टि देउनी कर्ममार्गि या सज्जन लोकांकडे
फिरुनियां यत्न करावा पुढें

---

## विद्यमान लोकस्थिति

( अभंग )

१

कोणी ओरडती धर्म नोळखितां त्यांतिल मर्म
पुण्य न घडे कोणा हातीं पापकर्म आचरीती
देवधर्म नाहीं गेहीं रामनाम तोंडीं नाहीं
सज्जनाचा करिती द्वेष वंदन करिती दुर्जनास

२

कोणी मातेला त्यागीती वेश्यापाय रगडती
देति गाईला खाटीका प्रेमें घेती श्वान अंका
स्वकीयांतें विसरूनी लागति परांच्या चरणीं
सेवाधर्म गोड वाटे उद्यम म्हणतां हृदय फाटे

३

कोणा वाटे द्यूत गोड त्यासि धूम्रपान जोड
प्रीय वाटे मद्यशाला धिक्कारी सद्यशाला
चहासेवन अहर्निश पानसुपारीचा ध्यास
केश कलाप डोक्यावरी भांग वांकडा भीतरीं

४

खोटे कागद लेखुनी मेळवीती धन कोणी
रुपयाला साक्षी सोळा हां हां म्हणतां होती गोळा
जन्माआधीं झाल्या गोष्टी स्वयें देखिल्या सांगती
सत्यासत्य ना विचार दृष्टि सारी स्वार्थावर

५

कलहांची गोडी फार त्यांसि वकीलांची भर
श्वान धरूनियां हातीं व्याघ्र म्हणूनी भांडती
खोटें खरें असो कांहीं याची मनीं चिंता नाहीं
कोणी वंदा कोणी निंदा ऐसा वकीलांचा धंदा

६

बोलति गोड तोंडावरी अंतर काढुनि घेती परी
निज हेतू साधावया दाखवीती कोणी माया
संधी येतांचि लाभाची सोडुनि कल्पना नीतीची
गळा केसानें कापीती कोणा समजों ना देती

७

कलहाची गोडी फार खोटा चित्तीं अहंकार
झाल्या गेल्या त्या त्या गोष्टी कोणी काढोनी तंडती
पक्षभेद मतांतरें यांचीं उघडलीं द्वारें
अन्यायाची भुतावळ स्वैर फीरे रानोमाळ

८

आज संस्था जन्मा आली मृत्युपंथा उद्यां गेली
आज एक नियम केला उद्यां पायीं तुडविला

आज एक वचन दिलें उद्यां त्याचें भस्म केलें
आज लोकांचा पुढारी उद्यां होई त्यांचा वैरी

९

लोकां दिसे एक घर परी त्यांत चूली चार
बाप लेक भाऊ भाऊ पाहति परस्परां खाऊं
जातिजातींमाजी वैरें शुद्ध नाहींत अंतरें
कलहलाटा देशभर उसळती अनिवार

१०

संकुचीत ठेवुनि दृष्टी लोक व्यवहारीं वागती
मी आणि माझी कांता विचार नाहीं यापुरता
स्वार्थ आणि संसार हेंचि कर्तव्याचें सार
स्वाभिमान देशसेवा याचा याशीं उभा दावा

११

विद्यमान लोकस्थिती पाहुनि वाटे मना खंती
स्वराज्याची कैशी प्राप्ती व्हावी आम्हाला या रीतीं
भाता फुंकीला फुंकीला अग्नीवीण व्यर्थ गेला
ऐक्य ईश्वर-भजन हेंचि स्वराज्य साधन

---

# ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

( वसंततिलका )

१

श्रीमान् अतां म्हणविसी जगिं आपुल्यास
आहे सुमंदिर तसेंच रहावयास
नाहीं तुवां कवडिही कधिं धर्म केला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

२

विद्येंत मत्सम नसे जगतांत अन्य
या संमदें म्हणविसी अपुल्यास धन्य
सद्ग्रंथ घेउनि परी नच वाचियेला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

३

अत्युच्चशा जगतिं जन्म कुलांत होय
होते सुनीत नत पूर्वज माननीय
वाटे तुला प्रिय सदा परि मद्यशाला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

४

मुष्टिप्रहार करुनी नमवीसि हत्ती
ऐशी प्रचंड तुझिया शरिरांत शक्ती
केलें न साह्य परिं तूं लवही कुणाला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?



ग्रंथ संग्रहालय ग्रं. क्र. ३०३

५

न्यायासनावरि तुवां बसलास थोर
झाला असें म्हणसि गौरव फारफार
नाहीं कुणा चुकुनिही परी न्याय दीला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

६

शृंगारुनी तनु महर्घ सुरम्य वस्त्रीं
भूपापरी मिरवशी प्रमुदें धरित्रीं
स्वदेह मात्र ऋणडोहिं परी बुडाला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

७

लोकांप्रती कथिसि तूं गृहिंची प्रतिष्ठा
भार्याकुतूहल, तशी निजधर्म–निष्ठा
लोभांत लाजविशि रे ! परि याचकाला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

८

अश्वावरीं बसुनियां रण-वीर-वेषें
मार्गांतुनी फिरसि उत्कट शब्दघोषें
पाहूनियां दंचकशी परि तूं सशाला
ही आढ्यता मग उगाच हवी कशाला ?

---

# उलटी दृष्टी

( श्लोक )

१

कळस बघुनि मोठा रम्य देवालयाचा
कुतुक जन करीती बोलुनी गोड वाचा
परि न कुणि पहाती मूळ आधारपाया
जगतिं उलट दृष्टी पुष्कळांची असे या

२

समरीं विजय होतां भूपती-कीर्ति गाती
बहुत जन तयाला आदरें भेट देती
परि, अरि वधि खड्गें युद्धभूमींत जो कीं
जगिं कुणि न तयाच्या विक्रमातें विलोकी

३

सुरगुरुसम विद्या प्राप्त झाली जगांत
अधिपतिसम मोठ्या राहि जो वैभवांत
शिशुपणीं परि जेथें वाढुनी थोर झाला
विसरुनि मग जाई निर्धनाच्या घराला

४

सकलसुखखनी जी मायभूमी विशाला
विपुल धन, सुधान्यें देइ पोषावयाला
इह विविध सुखांचे भोग हे भोगतांना
स्मरण परि तियेचें होइना मात्र कोणा

———

# कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

( श्लोक )

१

परांच्या छळानें अती त्रस्त झाला
महाराष्ट्र जेव्हां विलापीं बुडाला
रणीं दिव्य केलें स्वदेशार्थ ज्यांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

२

खरे धीर गंभीर वीर प्रभावी
सु-नीत स्वधर्मी सुधी सुस्वभावी
रणोत्कंठ, ऐक्येच्छु देशाभिमानी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

३

करीं खड्ग खांद्यावरीं तीक्ष्ण भाला
निघाले रिपूमर्दनाला रणाला
शिरोभाग शोभे जयश्री तुऱ्यांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

४

रणीं मारिले शत्रु खड्गप्रहारें
तसें संकटांना दिलें तोंड धीरें
धरा नादवीली यशोदुंदुभींनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

५

कडे पर्वतांचे वनें श्वापदांचीं
गृहें हींच राहावया भव्य साचीं
क्षुधा दाबिली वन्य मूळांफळांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

६

महाराष्ट्रलक्ष्मीप्रती रक्षण्याला
जिवाचा चुरा युद्धभूमींत केला
सदा ठेविला भाव भग्व्या निशाणीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

७

घरीं दारिं गांवीं वनीं वा गडांत
अरी-मर्दनाच्याच गोष्टी करीत
जयांची पहा रंगली नित्य वाणी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

८

स्वदेशार्थ सोडूनियां हे विलास
विकीलें जयांनीं सुखानें तनूस
जनां चेतवीलें पवाडे म्हणोनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

९

जयांच्या हृदीं नित्य देशैक्यभाव
विनाशी असे कल्पनांचा अभाव

अहंता वृथा त्यागियेली जयांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

१०

महाराष्ट्र दास्यांतुनी मुक्त केला
जगीं वैभवाच्या शिरीं बैसवीला
महा श्रेष्ठता मेळवीली जयांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?

---

## धर्मवीरास

( वृत्त–मोहिनी )

१

धर्मवीर म्हणुनी मोठी आढ्यता कशाला ?
ज्ञानधीर तुझिया हृदया सोडुनी पळाला !
मातृभूमि विमुक्त असली तरिच धर्म मुक्त
लोकसंघ जिवंत असला तरि धर्म जिवंत
राष्ट्र शक्त असलें स्वबळें तरिच धर्म शक्त
सद्विचार अजुनी परि हा शिवत ना मनाला ?

२

हिंदुधर्म रक्षायाची चालली लढाई
सान थोर जमले सगळे कराया चढाई

साद पडति निर्वाणीचे करा करा घाई
खुराड्यांत बसुनी परि तूं फसविशी जिवाला !

३

आत्मशक्ति-शस्त्रें सारीं हातचीं गळालीं
दिव्यदीप्ति सद्धर्माची संप्रती मळाली
जीवकला स्वोत्कर्षाची हृदयिंची जळाली
हातपाय थंडावूनी गारपणा आला !

४

भारतास भाग्यश्रीला असे पहायाचें
राष्ट्रधर्मपर्वतशिखरीं असे चढायाचें
राष्ट्रिं तेज आणायाचें कीर्तिवंत साचें
महोत्सवा बघुनी ऐशा वीट तुला आला ?

५

धर्म उचलुं म्हणतां म्हणतां जाय बुडायास
अन्यधर्मछाया पडुनी लागला क्षयास
हेळसांड होतां येइल मृत्यु अखेरीस
हिंदुधर्म ! म्हणुनी मग तूं बाहसी कुणाला ?

---

## पशु कोण ?

( शा. वि. )

१

नाहीं ज्ञान विचार शक्ति सुगिरा आम्हांपरी रे ! तुला
संज्ञा यास्तव ' मूढ वा पशु, अशी तूतें दिली प्रांजला

आम्ही श्रेष्ठ विशेष सर्व परिनीं सत्ता बळाच्या करीं
आहे जन्म वृथा तुझा परि खरा सर्वंसशंकावरी

२

ज्ञानी तूं म्हणतोस सर्व परिनीं हे मानवा ! भूतला !
आचाराप्रति पाहुनी मज गमे कीं ज्ञान नाहीं तुला
आतां प्रश्न विचारितों तुजसि मी जे लीनतेनें बरें
औदार्यें सदसद्विवेकमतिनें देईं तदीयोत्तरें

३

प्राण्यांना वधितां क्षुधा शमवितां मांसाशनें तत्त्वतां
स्वार्थानें दुबळ्यांस कीं चिरडितां टाकूनियां न्यायता
सारासारविचारता सरलता सच्छीलता त्यागितां
शास्त्राज्ञांस तुम्ही पदीं तुडवितां कीं निर्मिलेल्या स्वतां

४

देवाला न भितां सुरा पिउनियां रस्त्यावरी लोळतां
सानंदें व्यभिचार कर्म करितां रात्रीं घरें फोडितां
क्रूरत्वें किति जाळपोळ करितां नीतीस उच्छेदितां
अन्योन्यांस धनार्थ गुप्त वधितां चित्तीं दया नाणितां .

५

कृत्यें आचरितां पशूहुनि पशुत्वाचीं अशीं या जनीं
कीं जीं मानवनाम हीन करिती अश्रेय संपादुनी
याचा नीट विचार सर्व करूनी निष्कर्ष दे बा ! मनीं
आतां कोण असे पशू जगतिं या जीवांमधें जन्मुनी ?

---

# स्वातंत्र्यवीराची रणभूमीवरील तळमळ

( सरदार बापू गोखले रणावर पडले त्या वेळीं अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनांत घोळत असतील काय ? )

( शा० वि० )

१

हा दैवा ! रणिं घात हा अवचितां केलास माझा कसा !
या हस्तीं अपराध काय घडला अक्षम्य तूझा असा
राज्याशा धरुनी अरी-कटक जें युद्धांगणीं पातलें
त्याशीं कोण अतां विदार करुनी दंडील बाहूबळें

२

श्रीमंतास रणा भिऊनि पळतां थोडीच झाली क्षिती
देशामाजि न कोण वीर दिसती जे देश संरक्षिती
कीर्तिश्री रणविक्रमें मिळविली तद्वंशिं जे जन्मले
संग्रामांगणि ते अरीवश असे होऊं अतां लागले

३

कोणाच्या हृदयांत दिव्य न वसे देशाभिमानद्युती
भीतिग्रस्त समस्त लोक दिसती दुःखाश्रु संवर्षिती
देशामाजि तशांत वाढुनि कली झाला जनैक्यक्षय
शत्रूला प्रतिरोधण्यास मनिं ना कोणी करी निश्चय

४

स्वार्थाचा वणवा जनीं भडकुनी न्यायास ये अंधता
नीतिभ्रष्टपणा नृपालपुरुषांमाजी दिसे वाढता

पूर्वीचा इतिहास चित्तिं असतां साराचि वाटे कटु
ही राज्यस्थिति संप्रती बघुनियां मज्जीव लागे तुटूं

५

श्रीमत् पूज्य शिवें स्वराज्य-तरु जो राष्ट्रामधें लाविला
वीरांनीं निजरक्त सिंचुनि जया साम्राज्यि संवर्धिला
ज्याच्या शीतल सांवलींत बसुनी स्वाधीनता भोगिली
तो आतां लय पावणार! जळुनी या पारतंत्र्यानळीं

---

## ही सुधारणा

[ मंदाक्रांता ]

१

गांवोगांवीं बहुत वसल्या बालबालांस शाळा
प्रौढांसाठीं पुरिं उघडल्या ज्ञानसंस्था विशाला
लोकांठायीं सुविमल परी ज्ञानवृद्धी न झाली
पोटासाठीं अशुभद पराधीनता मात्र आली

२

आरोग्याचीं विविध भवनें जागजागीं बघा तीं
आरोग्यार्थ प्रतिदिनिं मुखीं औषधें लोक घेती
कोणाचेंही तनुबल परी वाढलेलें दिसेना
थोड्या काळीं तरुण अमुचे भेट देती स्मशाना

३

उद्योगांची किती तरी दिसे वाढ या भारतांत
बोलायाला तिळहि न मिळे चार गोष्टी उसंत

पेठा पेठा दिसती फुलल्या वस्तुंनीं या विदेशी
संपर्धीची नव नव परी वाढ झाली न देशी

४

संसाराच्या सतत गरजा वाढल्या फार फार
योग्यायोग्य स्वमनिं करिना कोणि याचा विचार
या भोगांचे भव-जलनिधीं वाढुनीयां पसारे
द्रव्याभावीं जन डुबगती कर्जडोहांत सारे

५

संस्थापीलीं लघुगुरु अशीं न्यायसिंहासनें तीं
न्यायप्रेमी वरि बसविल्या न्यायमूर्ती सुकीर्ती
कोठें कांहीं परि न हटले लोक-तंटेबखेडे
पाहावें तों उलट दिसती लोक हे द्वंद्ववेडे

---

## त्याचें काय मला ?

[ शा० वि० ]

१

आहे कोण नृपाल अन्य अथवा देशी स्वदेशामधीं
याचा नाहिं विचार लागत मला चित्तीं करावा कधीं
जावो देश लयास, लोक अवघे जावोत कोणीकडे
त्याचें काय मला ? बघीन हित मी माझें सदा तेवढें

दा. क्र. ३४३५

२

राहो धर्म बलिन् विशुद्ध अथवा होवो परस्वीकृत
चालो पूर्वजकीर्ति वा मलिन ती होवो पुरी निद्रित
वाढो भाग्य--तरु स्वदेशिं अथवा होवो तयाचें मढें
त्याचें काय मला ? वर्धीन हित मी माझें सदा तेवढें

३

शेजारी कुणिही जळांत बुडुं दे, अग्नीमुखीं जाउं दे
कोणीही लुटुं दे तयास, अथवा दुःखांत तो राहुं दे
हाहाःकार जरी विशेष दिसला लोकांत चोहींकडे
त्याचें काय मला ? वर्धीन हित मी माझें सदा तेवढें

४

जें जें मीं वदलों खरोखर असें साक्षी प्रभू ठेवुनी
त्याच्या होय विरुद्ध वर्तन, तरी खंती न वाटे मनीं
ढोंगी लोंचट लोभ-कीटक जरी मी होय लोकांपुढें
त्याचें काय मला ? वर्धीन हित मी माझें सदा तेवढें

समाप्त

काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें
परि त्या विश्वंभरें बोलविलें

REFBK-0003435
REFBK-0003435